■ www.lokrakshanay.com ■ epaper.lokrakshanay.com ■ dainiklokrakshanay@gmail.com ■ @dainiklokrakshanay ■ +91 97023 86118

RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118

दैनिक
# लोकरक्षणाय

लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

ठाणे । शुक्रवार, १२ जून २०२६ । वर्ष ०४ । अंक ७२ । पृष्ठे ०८ । मूल्य २ रूपये

अमराठी चालकांनी मराठी शिकावे - प्रताप सरनाईक



पान ८ वर

## थोडक्यात

### संगीत नाटक अकादमीचे प्रतिष्ठित पुरस्कार जाहीर

नवी दिल्ली : भारतीय संगीत, नृत्य, नाट्य आणि लोककलांच्या जतन व संवर्धनासाठी देशातील सर्वोच्च मानल्या जाणाऱ्या 'संगीत नाटक अकादमी'च्या वतीने वर्ष २०२४ आणि २०२५ साठीचे प्रतिष्ठित 'संगीत नाटक अकादमी फेलोशिप', 'संगीत नाटक अकादमी पुरस्कार' तसेच 'उस्ताद बिस्मिल्ला खाँ युवा पुरस्कार' जाहीर करण्यात आले आहेत. या पुरस्कारांमध्ये महाराष्ट्रातील अनेक ज्येष्ठ, दिग्गज तसेच युवा कलावंतांनी राष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळवत राज्याच्या समृद्ध सांस्कृतिक परंपरेचा गौरव वाढविला आहे.

### भारताने अमेरिकेकडे नोंदवला निषेध

नवी दिल्ली : ओमानच्या किनाऱ्याजवळ २४ भारतीय कर्मचारी असलेल्या व्यावसायिक टँकरवर अमेरिकेकडून झालेल्या हल्ल्याचा निषेध नोंदवण्यासाठी भारताने बुधवारी अमेरिकेचे चार्ज डी'अफेअर्स जेसन मीक्स यांना पाचारण केले अशी माहिती सूत्रांनी दिली आहे. या हल्ल्यानंतर जहाजावरील २४ कर्मचाऱ्यांपैकी तीन जण बेपत्ता झाले आहेत. या घटनेवर प्रतिक्रिया देताना नवी दिल्लीने म्हटले आहे की, पश्चिम आशियातील व्यावसायिक जहाज वाहतुकीवर आणि नागरी पायाभूत सुविधांवर होणारे हल्ले थांबले पाहिजेत आणि आंतरराष्ट्रीय जलमार्गांवरून होणारी मुक्त आणि विनाअडथळा वाहतूक लवकरात लवकर पूर्ववत झाली पाहिजे.


### राज्यातील सर्व आस्थापनांची पोश अधिनियमानुसार तपासणी करण्याचे महिला व बाल विकास आयुक्तांचे निर्देश

मुंबई : कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण करण्यासाठी पोश कायद्यानुसार समिती स्थापन करणे अनिवार्य आहे. राज्यामध्ये या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी महिला व बाल विकास विभागातील अधिकाऱ्यांबरोबरच जिल्हाधिकारी कार्यालयातील प्राधिकृत करण्यात आलेले अधिकारी यांच्यासह १२ संवर्गातील ४००० पेक्षा जास्त अधिकाऱ्यांनी राज्यातील शासकीय तसेच खासगी आस्थापनांमध्ये अधिनियमाची योग्य पद्धतीने अंमलबजावणी होत आहे किंवा नाही याची तातडीने तपासणी करण्याचे निर्देश आयुक्त यांनी दिले आहेत. आयुक्त डॉ. जगदीश मिनीयार यांच्या अध्यक्षतेखाली दुरदृश्य प्रणालीद्वारे बैठक झाली.

# अमेरिकेचा पुन्हा इराणवर हल्ला

## होर्मुझची सामुद्रधुनी बंद, अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :



अमेरिकेच्या 'सेंट्रल कमांड'नं बुधवारी इराणमधील विविध शहरांवर हल्ले केल्यानं मोठी खळबळ उडाली आहे. इराणकडून सुरू असलेल्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून ही कारवाई केली जात असल्याचं अमेरिकेच्या सेंट्रल कमांडनं प्रसार माध्यमावर स्पष्ट केलं आहे. अब्बास, सिरिक, मिनाब, केशम बेट आणि उत्तरेकडील गोरगन शहरात हल्ले करण्यात आले आहेत. अमेरिकेनं इराणवर हल्ले केल्यानं तेहराननं पुन्हा होर्मुझची सामुद्रधुनी बंद केली आहे. त्यामुळे पुन्हा मध्य पूर्वेतील देशात तेल, इंधनाचा तुटवडा निर्माण होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. दरम्यान अमेरिकेनं केलेल्या हल्ल्यात सेटबेल्लो या व्यापारी जहाजावरील तीन भारतीय खलाशी बेपत्ता झाल्याचं वृत्त होतं. मात्र, आता या व्यापारी जहाजावरील तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे. याबाबतची माहिती केंद्रीय जहाजबांधणी मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवारी दिली.

अमेरिकेचा इराणवर पुन्हा हल्ला : इराणच्या हल्ल्याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेनं बुधवारी सायंकाळी इराणवर जोरदार हल्ले केले आहेत. "कमांडर-इन-चीफ यांच्या निर्देशानुसार, अमेरिकेच्या सेंट्रल कमांड दलांनी बुधवारी सायंकाळी इराणमधील विविध शहरांवर स्वसंरक्षणार्थ हल्ले करण्यास सुरुवात केली. हे हल्ले इराणच्या सततच्या आक्रमकतेच्या प्रत्युत्तरात केले जात आहेत, असं अमेरिकन सैन्य दलाच्या वतीनं स्पष्ट करण्यात आलं आहे. अल जझीराच्या वृत्तानुसार, इराणमधील अनेक शहरांमध्ये स्फोट झाल्याच्या बातम्यांच्या पार्श्वभूमीवर, इराणच्या 'रेड क्रिसेंट'नं देशभरातील आपत्कालीन नियंत्रण कक्षांना सतर्क केलं आहे. इराणी प्रसारमाध्यम 'मेहर न्यूज एजन्सी'चा हवाला देत अल जझीरानं अब्बास या बंदरावर स्फोट झाल्याचं वृत्त दिलं. हे स्फोट शहराच्या पूर्व भागात असल्याचं नमूद करण्यात आलं. ● पान २ वर

## श्री रामाच्या जयघोषासह मंत्रोच्चारात सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा संपन्न

● नाशिक, सचिन कदम :



नाशिक त्र्यंबकेश्वर येथे पुढील वर्षी होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीचा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळ्याने शुभारंभ झाला आहे. आगामी कुंभमेळा स्वच्छ, सुरक्षित व भव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी शासन, प्रशासन, साधू-संत, महंत, विविध सामाजिक, धार्मिक संघटना आणि नागरिकांचा सहभाग आवश्यक आहे. सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी केले. श्री गंगा गोदावरी पंचकोटी (तीर्थ) पुरोहित संघ, नाशिकच्यावतीने सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर श्रीरामाच्या जयघोषात आणि वेद मंत्रोच्चारात सिंहस्थ कुंभमेळा ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन सोहळा आज सकाळी कमला एकादशीच्या पर्वावर पवित्र रामकुंड, नाशिक येथे कुंभमेळा मंत्री श्री. महाजन यांच्या उपस्थितीत झाला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी महापौर हिमगौरी आडके-आहेर, आमदार सीमा हिरे, विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, पोलीस आयुक्त संदीप कर्णिक, कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह, मनपा आयुक्त मनीषा खत्री, उपमहापौर विलास शिंदे, जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, माजी आमदार बाळासाहेब सानप, पुरोहित संघाचे सतीश शुक्ल यांच्यासह विविध आखाड्यांचे प्रमुख साधू-संत, महंत उपस्थित होते.

● पान २ वर

## नीती आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या प्रगतीचा रोड मॅप सादर

● मुंबई, विशाल कारंडे :

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे २०४७ पर्यंत विकसित भारत घडविण्याचे स्वप्न साकार करण्यासाठी शिक्षण, आरोग्य, कौशल्य विकास, महिला सक्षमीकरण आणि सर्वसमावेशक मानवी विकास या पाच प्रमुख बाबींवर महाराष्ट्र शासन विशेष भर देत आहे. राज्याच्या आर्थिक प्रगतीसोबतच समतोल व सर्वसमावेशक विकासाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व क्षेत्रात व्यापक प्रयत्न करण्यात येत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.




राष्ट्रपती भवनातील सांस्कृतिक केंद्रात आज प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नीती आयोगाच्या नियामक मंडळाच्या (गव्हर्निंग कौन्सिल) अकराव्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्राच्या सर्वसमावेशक विकासाचा रोड मॅप सादर केला. या बैठकीस केंद्रीय मंत्री, विविध राज्यांचे मुख्यमंत्री, केंद्रशासित प्रदेशांचे उपराज्यपाल, नीती आयोगाचे उपाध्यक्ष अशोककुमार लाहिडी आणि सदस्य उपस्थित होते. ● पान २ वर

## 'वसंत बहार' मधून मराठी भावसंगीताची अनुभूती

● मुंबई, विशाल पाटील :

महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभागांतर्गत सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्या वतीने ज्येष्ठ संगीतकार दिवंगत वसंत पवार यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त आयोजित 'वसंत बहार – मराठी भावसंगीतातील वसंत ऋतू' या कार्यक्रमात शब्द सुरांच्या भावनिक अनुभूतेने श्रोते चांगलेच मंत्रमुग्ध झाले. विलेपार्ले येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर नाट्यगृहात नुकताच हा कार्यक्रम झाला. मराठी भावसंगीताच्या सुवर्णकाळातील अजरामर गीतांनी सजलेल्या या कार्यक्रमाला रसिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. मराठी चित्रपटसृष्टी आणि भावसंगीत क्षेत्रात आपल्या संगीताचा अमिट ठसा उमटविणारे ज्येष्ठ संगीतकार वसंत पवार यांच्या संगीत क्षेत्रातील बहुमोल योगदानाला आदरांजली अर्पण करण्यात आली. यासोबतच ज्येष्ठ संगीतकार वसंत प्रभू आणि वसंत देसाई यांनी

**जन्मशताब्दी वर्षानिमित्त ज्येष्ठ संगीतकार वसंत पवार यांना सांगीतिक अभिवादन**




संगीतबद्ध केलेल्या लोकप्रिय व अजरामर गीतांचेही सादरीकरण करण्यात आले. 'वसंत बहार' या स्वरमैफिलीतून वसंत पवार, वसंत प्रभू आणि वसंत देसाई या तीन दिग्गज संगीतकारांच्या सांगीतिक वारशाचा वेध घेण्यात आला. ● पान २ वर

## धुळे जिल्ह्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करावेत – पालकमंत्री जयकुमार रावल

● धुळे, नितीन देवळेकर :

आकांक्षित धुळे जिल्ह्यात जिल्हा वार्षिक योजनेच्या माध्यमातून सर्वसमावेशक विकासासाठी प्रयत्न करावेत, असे निर्देश राज्याचे पणन व राजशिष्टाचार मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी आज केले.

पालकमंत्री श्री. रावल यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयातील नवीन नियोजन सभागृहात जिल्हा वार्षिक योजनेची आढावा बैठक झाली. त्यावेळी पालकमंत्री श्री. रावल बोलत होते. यावेळी खासदार डॉ. शोभा बच्छाव, आमदार अमरिशभाई पटेल, आमदार काशिराम पावरा, आमदार श्रीमती मंजुळा गावित, जिल्हा नियोजन समितीच्या सदस्य सचिव तथा जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते,



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी बाबासाहेब बेलदार, पोलीस अधीक्षक विशाल आनंद, महानगरपालिका आयुक्त नितीन कापडणीस, अपर जिल्हाधिकारी सुभाष बोरकर, निवासी उपजिल्हाधिकारी शरद पवार, जिल्हा नियोजन अधिकारी सुनील सोनार, सहायक नियोजन अधिकारी संतोष वानखेडे, एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी अरुण पवार, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त देविदास नांदगावकर यांच्यासह सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. रावल म्हणाले की, यंदाच्या जिल्हा वार्षिक योजनेतून मंजूर करण्यात आलेल्या निधीचा प्रभावी वापर करून विकास कामे वेळेत पूर्ण करावीत. नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन सर्व तालुक्यातील लोकप्रनिधीशी समन्वय साधून विकासकामांचे नियोजन, योजनांची प्रभावी अंमलबजावणी आणि गुणवत्ता राखून विकास कामे पूर्ण करावीत. सर्व तालुक्यातील विकासकामे होतील यासाठी सर्व यंत्रणांनी नियोजनपूर्वक आणि समन्वयाने कामे करावे.

शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनाला योग्य बाजारभाव मिळावा तसेच कृषी मालाचे स्थानिकस्तरावर मूल्यवर्धन व्हावे यासाठी जिल्ह्यात मिलेट, सोलर, कृषीवर आधारीत फूड प्रोसेसिंग युनिट्स उभारण्यावर भर देण्यात यावा. ● पान २ वर

## आजपासून २१ जूनपर्यंत टप्प्याटप्प्याने २४ तास पाणीपुरवठा बंद राहणार

● कल्याण, गणेश बागडे :

मान्सूनच्या आगमनाला झालेला विलंब आणि संभाव्य पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेने (केडीएमसी) पाणीपुरवठ्यात कपात करण्याचा निर्णय घेतला आहे. राज्याच्या जलसंपदा विभागाच्या निर्देशानुसार २१ जूनपर्यंत विविध भागांमध्ये २४ तासांसाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार आहे.

भारतीय हवामान विभागाने (IMD) एल निनो आणि इतर हवामानविषयक घटकांमुळे मान्सून लांबण्याची शक्यता



वर्तवली आहे. त्यामुळे राज्य सरकारने ३१ ऑगस्टपर्यंत पाणी व्यवस्थापनाचे नियोजन करण्याच्या सूचना स्थानिक स्वराज्य संस्थांना दिल्या आहेत.

या पार्श्वभूमीवर ९ जून रोजी झालेल्या आढावा बैठकीत महापालिका, एमआयडीसी आणि इतर यंत्रणांना दररोज २० टक्के पाणीबचतीचे नियोजन करण्याचे निर्देश देण्यात आले. ● पान २ वर

## 'मेडिसिटी'द्वारे जागतिक दर्जाची आरोग्यसेवा परिसंस्था प्रत्यक्षात येणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● नवी मुंबई, भावना जैन :

'मेडिसिटी' ही रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि प्रतिभेला एका एकात्मिक केंद्रात एकत्र आणणारी जागतिक दर्जाची आरोग्य सेवा परिसंस्था उभारण्याची राज्य शासनाची संकल्पना आहे. ही संकल्पना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी मांडलेल्या 'हील इन इंडिया' या दृष्टिकोनाशी सुसंगत असून लवकरच ती प्रत्यक्षात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.




जगातील सर्वात महत्त्वाकांक्षी आरोग्य सेवा परिसंस्थांपैकी एक उभारण्याच्या दिशेने एक ऐतिहासिक पाऊल टाकत महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड

**राज्य शासन, क्लीव्हलँड क्लिनिक, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यात नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी विकसित करण्यासाठी सामंजस्य करार**

क्लिनिक (सीसी), ब्रुकफिल्ड ॲसेट मॅनेजमेंट आणि आरोधन हेल्थ सिटी (एएचसी) यांनी नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटीच्या विकासासाठी सहकार्य करण्याबाबत सामंजस्य करार केला. या ऐतिहासिक प्रसंगाचे साक्षीदार म्हणून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस मुंबईहून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे सहभागी झाले होते. त्यांच्यासोबत वरिष्ठ शासकीय अधिकारी तसेच ब्रुकफिल्ड आणि एएचसीचे प्रतिनिधीही उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांचे मुख्य सल्लागार कौस्तुभ धवसे यांनी क्लीव्हलँड क्लिनिकच्या मुख्यालयात महाराष्ट्र शासनाचे प्रतिनिधित्व केले. क्लीव्हलँड क्लिनिकच्या पथकाचे नेतृत्व त्यांचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. टोमिस्लाव मिहाल्जेविक, डॉ. समीर कपाडिया (अध्यक्ष, कार्डिओव्हॅस्क्युलर मेडिसिन), डॉ. फाल्कोने (अध्यक्ष, इमर्जिंग मार्केट्स) आणि आर्सेलर मित्तलचे कार्यकारी अध्यक्ष तसेच क्लीव्हलँड क्लिनिकचे संचालक मंडळ सदस्य श्री. लक्ष्मी मित्तल यांनी केले. ● पान २ वर

# एच-१ बी शुल्कवाढीला न्यायालयाचा ब्रेक

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी परदेशी कुशल व्यावसायिकांच्या अमेरिकेतील प्रवेशावर मर्यादा आणण्याच्या उद्देशाने प्रस्तावित केलेल्या एच-१ बी व्हिसावरील प्रचंड शुल्कवाढीला फेडरल न्यायालयाने बेकायदेशीर ठरवत रद्द केले आहे. या निर्णयामुळे भारतीय आयटी उद्योगासह जागतिक तंत्रज्ञान क्षेत्राला मोठा दिलासा मिळाला असून बोस्टन येथील फेडरल न्यायालयाचे न्यायाधीश लिओ सोरोकिन यांच्या निकालाची आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठी चर्चा होत आहे.

ट्रम्प प्रशासनाने नव्या एच-१ बी व्हिसा अर्जांवर तब्बल १ लाख डॉलर (सुमारे ८३ ते ८४ लाख रुपये) अतिरिक्त शुल्क आकारण्याचा प्रस्ताव ठेवला होता. याआधी हे शुल्क साधारणतः २ हजार ते ५ हजार डॉलरच्या दरम्यान होते. प्रशासनाचा दावा होता की, परदेशी तज्ज्ञांमुळे अमेरिकन नागरिकांच्या रोजगाराच्या संधी कमी होत आहेत आणि शुल्कवाढीमुळे कंपन्या स्थानिक उमेदवारांना प्राधान्य देतील.

मात्र, न्यायालयाने हा युक्तिवाद फेटाळून लावत या शुल्कवाढीला घटनाबाह्य ठरवले. डेमोक्रॅटिक पक्षाशी संबंधित २० राज्यांच्या ॲटर्नी जनरल्सनी या निर्णयाविरोधात न्यायालयात याचिका दाखल केली होती. सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट केले की, प्रस्तावित रक्कम ही केवळ व्हिसा शुल्क नसून प्रत्यक्षात नवीन करासारखी आहे. अमेरिकेच्या संविधानानुसार असा कर लावण्याचा अधिकार केवळ संसदेला आहे; राष्ट्राध्यक्षांना नाही.

न्यायालयाने राष्ट्राध्यक्षांच्या कार्यकारी अधिकारांच्या मर्यादांवरही स्पष्ट भाष्य केले. या अवाजवी शुल्कामुळे उद्योग, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रात आधीच चिंतेचे वातावरण निर्माण झाले होते. काही मोठ्या कंपन्यांनीच हे शुल्क भरून अर्ज दाखल केले होते, तर लहान संस्था, सरकारी शाळा आणि रुग्णालयांसाठी असा आर्थिक भार पेलणे कठीण ठरत होते.

एच-१ बी व्हिसाचा वापर केवळ तंत्रज्ञान कंपन्याच करत नाहीत, तर विद्यापीठे, संशोधन संस्था आणि रुग्णालयेही परदेशी प्राध्यापक, संशोधक आणि डॉक्टरांच्या नियुक्तीसाठी या व्हिसाचा आधार घेतात. त्यामुळे हा नियम कायम राहिला असता, तर अमेरिकेत कुशल मनुष्यबळाची कमतरता अधिक तीव्र झाली असती.

भारतासाठी हा निकाल विशेष महत्त्वाचा मानला जात आहे. दरवर्षी अमेरिकेकडून दिल्या जाणाऱ्या एच-१ बी व्हिसांपैकी सुमारे ७० ते ७५ टक्के व्हिसा भारतीय आयटी व्यावसायिक आणि अभियंत्यांना मिळतात. टीसीएस, इन्फोसिस आणि विप्रोसारख्या भारतीय कंपन्यांबरोबरच गुगल, ॲमेझॉन, मायक्रोसॉफ्ट आणि मेटा यांसारख्या जागतिक तंत्रज्ञान कंपन्या मोठ्या प्रमाणावर भारतीय तज्ज्ञांची नियुक्ती या व्हिसाद्वारे करतात.

शुल्कवाढ रद्द झाल्यामुळे भारतीय प्रतिभेसाठी अमेरिकेतील संधी पुन्हा खुल्या झाल्या आहेत. अमेरिकेतील भारतीय समुदायासह आयटी क्षेत्रातील व्यावसायिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. तसेच उच्च शिक्षण आणि करिअरच्या संधींसाठी अमेरिकेकडे पाहणाऱ्या भारतीय तरुणांवरील अनिश्चिततेचे सावटही दूर झाले आहे.

ट्रम्प प्रशासनाने या निर्णयाविरोधात उच्च न्यायालयात जाण्याची शक्यता व्यक्त केली असली, तरी सध्या न्यायालयाने या शुल्कवाढीवर पूर्ण स्थगिती दिली आहे. त्यामुळे जागतिक व्यापार, कौशल्याधारित रोजगार आणि प्रतिभेच्या मुक्त देवाणघेवाणीला पुन्हा एकदा चालना मिळाल्याचे मानले जात आहे.

– अनिकेत घनश्याम भंकाळ

संपादकीय

## पान १ वरुन

### अमेरिकेचा पुन्हा इराणवर हल्ला

**इराणमधील अनेक शहरांवर अमेरिकेचा हल्ला :** सिरिक आणि मिनाब ही दक्षिणेकडील शहरं, केशम बेट आणि उत्तरेकडील गोरगन शहर अशा अनेक ठिकाणी स्फोट झाल्याची माहिती इराणमधील प्रसारमाध्यमांनी दिली आहे. पश्चिम तेहरानमध्ये हवाई संरक्षण यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्याचं इराणी प्रसारमाध्यमांच्या हवाल्यानं अल जझीरानं स्पष्ट केलं. परिस्थिती अजूनही अस्थिर असून इराणमधील आपत्कालीन प्रतिसाद यंत्रणांना उच्च सतर्कतेवर ठेवण्यात आलं आहे, असं अल जझीरानं स्पष्ट केलं आहे. इराणनं एर्बिलमधील अमेरिकेच्या 'अल-हरिर' हवाई तळावर क्षेपणास्त्र हल्ला केला असून, यात इराकमधील कुर्दिस्तान प्रदेशातील अमेरिकेची रडार यंत्रणा नष्ट झाली आहे, असा दावा इराकी प्रसारमाध्यमांनी केला आहे.

**राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता इशारा :** वॉशिंग्टनसोबतचा करार पूर्ण करण्यात तेहरानकडून होत असलेल्या विलंबाबद्दल अमेरिकन राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी निराशा व्यक्त केली होती. अमेरिकेकडून इराणवर पुन्हा हल्ले केले जातील, असा इशारा राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिला होता. त्यानंतर हे हल्ले घडले आहेत, असं संरक्षण तज्ज्ञांकडून सांगितलं जात आहे. ओव्हल ऑफिसमध्ये बोलताना ट्रम्प म्हणाले, "आम्ही त्यांच्यावर हल्ला करणार आहोत, अतिशय जोरदार हल्ला करणार आहोत." इराणनं अमेरिकेचे 'अपाची' हेलिकॉप्टर पाडल्यामुळे पुन्हा सैन्य कारवाई करण्याचे कारण मिळाले, असं राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी स्पष्ट केलं. "त्या हेलिकॉप्टरच्या घटनेमुळे, मला वाटते की आम्हाला हल्ला करण्याचा अधिकार आहे," असं त्यांनी पत्रकारांना सांगितलं होतं.

**अमेरिकेच्या हल्ल्यात तीन भारतीय खलाशांचा मृत्यू :** ओमानच्या किनाऱ्याजवळ 'सेट्टबेल्लो' (Settebello) या व्यापारी जहाजावर अमेरिकन सैन्य दलानं हल्ला केला. या व्यापारी जहाजावर २४ भारतीय खलाशी होते. मात्र, अमेरिकेनं केलेल्या हल्ल्यात ३ भारतीय खलाशी सुरुवातीला बेपत्ता झाल्याचं समोर आलं होतं. मात्र, आता या व्यापारी जहाजावरील तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला आहे. याबाबतची माहिती केंद्रीय जहाजबांधणी मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी गुरुवारी दिली. दरम्यान, अमेरिकेनं केलेल्या या हल्ल्याचा भारतानं तीव्र निषेध केला आहे. भारतानं अमेरिकेचे राजदूतावास प्रमुख जेसन मीक्स यांना बुधवारी बोलावून घेतलं. या जहाजावरील हल्ल्यानंतर, आंतरराष्ट्रीय सागरी संघटनेनं (IMO) याबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. खलाशांचे प्राण आणि आंतरराष्ट्रीय जहाजवाहतुकीची सुरक्षा धोक्यात आणणारी कोणतीही कृती पूर्णपणे अस्वीकार्य असल्याचं संघटनेनं म्हटलं आहे. परराष्ट्र मंत्रालयातील (MEA) सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, या घटनेबाबत अमेरिकेचे 'चार्ज डी'अफेअर्स' जेसन मीक्स यांना निषेध दर्शवणारे अधिकृत पत्र सुपूर्द करण्यात आलं. या जहाजावरील २४ भारतीय खलाशांपैकी २१ जणांची सुटका करण्यात आली आहे. मात्र, तीन जणांचा मृत्यू झाला आहे.

### श्री रामाच्या जयघोषासह मंत्रोच्चारात...

मंत्री श्री. महाजन म्हणाले की, पुढील वर्षी नाशिक-त्र्यंबकेश्वर येथे सिंहस्थ कुंभमेळा होत असून मागील कुंभमेळ्यापेक्षा चार ते पाच पट अधिक, म्हणजेच १२ कोटींपेक्षा जास्त भाविकांच्या आगमनाची अपेक्षा आहे. त्यामुळे कुंभमेळा यशस्वी करण्याची जबाबदारी शासन, प्रशासनाबरोबरच प्रत्येक नागरिकाची आहे. गोदावरी नदी स्वच्छ ठेवण्यासाठी विविध संघटनांनी आणि भक्तगणांनी पुढाकार घेतला असून ही स्वच्छता केवळ एका दिवसापुरती नसून सातत्याने राखली जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. देश-विदेशातून येणाऱ्या भाविकांचे आदरातिथ्य करण्यासाठी प्रत्येक नाशिककराने स्वयंसेवक बनून पुढाकार घ्यावा.

कुंभमेळ्याच्या अनुषंगाने नाशिक, त्र्यंबकेश्वर आणि जिल्ह्यात विविध विकासकामांना वेग आला आहे. रस्ते, पायाभूत सुविधा, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता आणि नागरी सुविधांसाठी सुमारे ३५ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासकामांची अंमलबजावणी सुरू आहे. या विकासकामांमुळे पुढील वर्षी नाशिकचा चेहरामोहरा पूर्णपणे बदललेला दिसेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कुंभमेळ्याच्या तयारीत साधू-संत, महंत, आखाडे, लोकप्रतिनिधी, प्रशासन, पोलीस यंत्रणा आणि नागरिक यांचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगून मंत्री श्री. महाजन यांनी सर्वांचे सहकार्य अपेक्षित असल्याचे नमूद करुन त्यांनी कुंभमेळा यशस्वी करण्यासाठी एकजुटीने कार्य करण्याचे आवाहन केले. यावेळी जगद्गुरू रामानंदाचार्य नरेंद्राचार्य महाराज, संजयदत्त महाराज यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी दिगंबर आखाड्याचे महंत वैष्णवदास महाराज, मंगल पीठाधीश्वर माधवाचार्य महाराज, निर्वाणी आखाड्याचे महंत मुरलीधरदास महाराज, महंत मोहनदास महाराज, महंत राजेंद्रदास महाराज, महंत रामजीदास महाराज, महंत भक्तिचरणदास महाराज, रामकिशोरदास शास्त्री महाराज, महंत रामस्नेहीदास महाराज यांच्यासह विविध आखाड्यांचे संत-महंत, भाविक, नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते विधीवत पूजा करुन गंगा गोदावरीचे पूजन करण्यात आले. शंखनाद आणि उपस्थितांच्या टाळ्यांच्या गजरात ध्वजस्तंभ शिलान्यास पूजन समारंभ भक्तीमय वातावरणात पार पडला. पुरोहित संघाच्या सदस्यांनी मंत्रोच्चार केले.

### नीती आयोगाच्या बैठकीत महाराष्ट्राच्या...

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, एकूण सकल देशांतर्गत उत्पन्नात सुमारे १४ टक्के योगदान देणारे महाराष्ट्र हे देशाचे आर्थिक इंजिन आहे. राज्यात मोठ्या प्रमाणावर पायाभूत सुविधा विकसित होत असल्या तरी सुशिक्षित, कुशल, निरोगी आणि सक्षम नागरिक हीच महाराष्ट्राची खरी ताकद आहे. या पार्श्वभूमीवर विकसित महाराष्ट्र – २०४७ हे व्हिजन डॉक्युमेंट जाहीर करण्यात आले असून २०३० पर्यंत एक ट्रिलियन डॉलर, २०३५ पर्यंत दोन ट्रिलियन आणि २०४७ पर्यंत पाच ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था उभारण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राज्यातील सर्व विभागांनी २०२९-३० पर्यंतच्या कालावधीसाठी कृती आराखडे तयार केले असून शाश्वत विकास उद्दिष्टांची वेळेत पूर्तता करण्यावर राज्याचा भर देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आकांक्षित जिल्ह्यांची संख्या चारवरून दहापर्यंत आणि आकांक्षित तालुक्यांची संख्या २७ वरून १७७ पर्यंत वाढविण्यात आली असून या भागांच्या सर्वांगीण विकासावर विशेष लक्ष केंद्रित करण्यात येत आहे.

**पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षणापर्यंत व्यापक सुधारणा**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण – २०२० ची सर्वसमावेशक अंमलबजावणी करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य असल्याचे सांगून मुख्यमंत्री पुढे म्हणाले बहुविद्याशाखीय शिक्षण, मल्टिपल एन्ट्री-एक्झिट प्रणाली, कौशल्य आधारित अभ्यासक्रम, इंटर्नशिप तसेच एआय, रोबोटिक्स, डेटा सायन्स आणि ब्लॉकचेनसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा शिक्षणात समावेश करण्यात येत आहे. तसेच नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात देशातील पहिली जागतिक दर्जाची एज्युसिटी विकसित करण्यात येत असून ती देश-विदेशातील विद्यार्थ्यांसाठी आकर्षण केंद्र ठरेल, असेही त्यांनी सांगितले.

मुख्यमंत्री म्हणाले की, पूर्व प्राथमिक शिक्षण मजबूत करण्यासाठी 'पोषण भी – पढाई भी', आरंभ, स्मार्ट अंगणवाडी आणि सक्षम अंगणवाडी यांसारखे उपक्रम राबविण्यात येत आहेत. बालस्नेही शिक्षण वातावरण निर्माण करण्यासाठी डिजिटल साधनांचा वापर आणि अंगणवाडी सेविकांचे प्रशिक्षण सुरू आहे. शालेय शिक्षणात महाराष्ट्राची परफॉर्मन्स ग्रेडिंग इंडेक्समध्ये प्रचेष्टा-१ कडे वाटचाल सुरू आहे. राज्यात २ कोटी आठ लाखांपेक्षा अधिक 'अपार आयडी' तयार करण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांची गळती शून्यावर आणणे, डिजिटल वर्ग, व्यावसायिक शिक्षण तसेच मुली, आदिवासी व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सर्वसमावेशक शिक्षण सुविधा उपलब्ध करण्याचे उद्दिष्ट राज्याने ठेवले आहे.

**कौशल्य विकास, स्टार्टअप आणि नवसंशोधनाला चालना**

राष्ट्रीय प्रशिक्षणार्थी प्रोत्साहन योजनेत महाराष्ट्र देशात प्रथम क्रमांकावर असून राज्यात ३ लाख ३० हजारांहून अधिक प्रशिक्षणार्थी नोंदणीकृत आहेत. महाराष्ट्र स्टार्टअप, उद्योजकता आणि नवसंशोधन धोरण २०२५ अंतर्गत पुढील पाच वर्षांत १ लाख २५ हजार उद्योजक घडविणे आणि ५० हजार स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. एआय, डीप-टेक, फिनटेक आणि शाश्वतता या क्षेत्रांवर विशेष भर दिला जात असून 'महाराष्ट्र इनोव्हेशन सिटी' विकसित करण्यात येत आहे. तसेच कुशल युवकांना आंतरराष्ट्रीय स्तरावर रोजगार संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'महाराष्ट्र एजन्सी फॉर होलिस्टिक इंटरनॅशनल मोबिलिटी' ही संस्था स्थापन करण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

**आरोग्य क्षेत्रात व्यापक विस्तार**

आरोग्य सेवा शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्य कटिबद्ध असून आयुष्मान भारत आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेंतर्गत उपचार पॅकेजेसची संख्या २३९९ पर्यंत वाढविण्यात आली आहे. राज्यात ४५३७ रुग्णालये या योजनांशी संलग्न करण्यात आली आहेत.

शहरी भागांसाठी स्वतंत्र शहरी आरोग्य आयुक्तालय स्थापन करण्यात आले असून ११ नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचे काम सुरू आहे. मेडिसिटी संकल्पनेद्वारे वैद्यकीय शिक्षण, संशोधन, तृतीयक आरोग्यसेवा आणि आयुष प्रणाली यांचे एकत्रीकरण करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

**महिला सक्षमीकरणाला गती**

महिला सक्षमीकरण हे आर्थिक विकासाचे प्रमुख साधन असल्याचे नमूद करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, उमेद अभियानाअंतर्गत राज्यात ५० लाख लखपती दिदी झाल्या असून ही संख्या एक कोटीपर्यंत नेण्याचा मानस आहे. बचत गटांच्या उत्पादनांसाठी १३ जिल्हास्तरीय उमेद मॉल्स उभारण्यात येत आहेत.

लाडकी बहीण योजनेतर्गत सध्या १.६६ कोटी महिला लाभार्थी असून या योजनेमुळे महिलांचे आर्थिक स्वावलंबन, उद्योजकता आणि आरोग्य सुधारण्यास मदत झाली आहे, असे त्यांनी सांगितले.

**सर्वसमावेशक विकासावर भर**

अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, ओबीसी, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक आणि दिव्यांग व्यक्तींसाठी शिक्षण व कौशल्य विकासाच्या माध्यमातून संधी निर्माण करण्यावर राज्याचा भर असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले. एससी, एसटी आणि ओबीसी विद्यार्थ्यांसाठी १०० नवीन वसतिगृहे उभारण्यात येत असून त्यात २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांची व्यवस्था होणार आहे.

**प्रशासनात तंत्रज्ञान आणि सुधारणा**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, महाराष्ट्राने ८०० हून अधिक नागरिक आणि व्यवसाय सेवांची प्रक्रिया पुनर्रचना केली आहे. महासारथी आणि महाडीबीटी २.०द्वारे नागरिक सेवा अधिक सुलभ करण्यात येत आहेत. अर्जातील रकाने आणि कागदपत्रांची संख्या मोठ्या प्रमाणात कमी करण्यात आली आहे. महाराष्ट्र एआय धोरण २०२६ अंतर्गत १० हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक गुंतवणूक आकर्षित करण्याचे आणि १.५ लाख रोजगार निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. कृषी क्षेत्रासाठी महाॲग्री-एआय धोरण महाॲगएक्स आणि महाट्रेस यांसारखे डिजिटल उपक्रम सुरू करण्यात आले आहेत.

**गडचिरोलीसाठी विशेष विकास आराखडा**

गडचिरोली जिल्ह्यासाठी नक्षलग्रस्त भागोत्तर विकास कार्ययोजना राबविण्यात येत असून पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगार निर्मितीवर भर दिला जात आहे. गडचिरोलीला भारतातील पहिले मोठे इंटिग्रेटेड स्टील हब म्हणून विकसित करण्यात येत असल्याचेही मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

**पर्यटन आणि औद्योगिक विकासाला चालना**

'एक राज्य, एक जागतिक पर्यटन स्थळ' योजनेअंतर्गत सिंधुदुर्ग आणि नाशिक या ठिकाणांचा जागतिक पर्यटन स्थळ म्हणून विकास करण्यात येणार आहे. राज्यभरात १०० पर्यटन उप-परिपथ विकसित करण्याचे उद्दिष्ट असून धार्मिक, वारसा, जल, बेट आणि अनुभवात्मक पर्यटनाला प्रोत्साहन दिले जाणार आहे. राज्यात ६३.८५ लाखांहून अधिक एमएसएमई कार्यरत असून २.५ कोटींहून अधिक लोकांना रोजगार उपलब्ध झाला आहे. भारतातील एकूण एफडीआयपैकी सुमारे ३१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात येत असल्याचे नमूद करून महाराष्ट्र उद्योग, गुंतवणूक आणि सेवा धोरण २०२५ अंतर्गत २०.३ लाख कोटींच्या गुंतवणुकीची पाइपलाईन तयार झाली आहे. मैत्री प्रणालीद्वारे सिंगल विंडो क्लिअरन्स, वेळेत मंजुरी आणि उद्योगस्नेही वातावरण निर्माण करण्यात आले असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबई येथे इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी स्थापन करण्यास मंजुरी दिल्याबद्दल मुख्यमंत्री यांनी प्रधान मंत्री नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. शेवटी मुख्यमंत्री फडणवीस यांनी विकसित भारत २०४७ साठी महाराष्ट्र शासनाची कटिबद्धता व्यक्त करत केंद्र सरकार आणि सर्व राज्यांच्या सहकार्याने देशाला समृद्ध, आत्मनिर्भर आणि न्याय्य राष्ट्र बनविण्याचा संकल्प व्यक्त केला.

### 'वसंत बहार' मधून मराठी...

मराठी भावसंगीतातील सुरेलता, भावस्पर्शी शब्द आणि समृद्ध संगीतपरंपरेचे दर्शन या कार्यक्रमातून घडले. कार्यक्रमातील प्रत्येक गीताला रसिकांनी भरभरून दाद दिली.

मराठी संगीतविश्वाच्या समृद्ध परंपरेचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमामुळे भावसंगीताच्या सुवर्णकाळातील सांगीतिक वैभवाचा अनुभव रसिकांना घेता आला. वसंत पवार, वसंत प्रभू आणि वसंत देसाई या तीन दिग्गज संगीतकारांच्या अजरामर संगीतसंपदेचा परिचय करून देत त्यांच्या कार्याला या कार्यक्रमातून अभिवादन करण्यात आले. मराठी भावसंगीतातील सुरेलता, भावस्पर्शी शब्द आणि संगीताची समृद्ध परंपरा यांचे प्रभावी दर्शन या कार्यक्रमातून घडले. गायिका केतकी भावे-जोशी, श्रद्धा वेटे तसेच गायक नचिकेत देसाई यांनी आपल्या सुमधुर गायनातून मराठी भावसंगीतातील अनेक गाजलेली गीते यावेळी सादर केली. कार्यक्रमाचे निवेदन अनघा मोडक यांनी केले, तर संगीत संयोजनाची धुरा प्रशांत लळित यांनी सांभाळली.

### धुळे जिल्ह्याच्या सर्वसमावेशक विकासासाठी...

जिल्हा वार्षिक योजनेतून राबविण्यात येणाऱ्या विविध विकास कामांचे भूमिपूजनासाठी लोकप्रतिनिधींना आमंत्रित करावे. जिल्ह्यात वन विभागाने वृक्ष लागवड करीत वनाच्छादान वाढवावे. जिल्ह्यातील बंधारे, प्रकल्प, धरणामधील गाळ काढण्यात यावा. नवीन शाळांचे बांधकाम करतांना स्वच्छतागृह, पिण्याचे पाणी अशा मूलभूत सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

प्रत्येक तालुक्यात वीज प्रतिबंधक यंत्रे बसविण्यात यावेत. पुनर्वसित गावांचे प्रश्न सोडविण्यासाठी नियमित आढावा घेण्यात यावा. तालुकास्तरावर समन्वय समितीची बैठक घेण्यात यावी. संपूर्ण जिल्ह्यात वन पर्यटन विकास, इको टुरिझमचे कामे करावीत. सर्व शासकीय कार्यालये, शाळा,आश्रमशाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र येथे सौर संयंत्र बसविण्यात यावेत. असेही निर्देश पालकमंत्री श्री. रावल यांनी दिले. यावेळी खासदार डॉ. बच्छाव, आमदार श्री.पटेल, आमदार श्री.पावरा, आमदार श्रीमती गावित यांनी विविध विषयांच्या चर्चेत सहभाग घेऊन विविध सूचना केल्या. जिल्हा नियोजन अधिकारी श्री. सोनार, आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी श्री. पवार, समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त श्री. नांदगावकर यांनी सादरीकरण केले.

या बैठकीत २२ जानेवारी, २०२६ रोजी झालेल्या बैठकीच्या इतिवृत्तास मान्यता, जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२०२६ मध्ये झालेल्या खर्चास मान्यता देणे, तसेच जिल्हा वार्षिक योजना मार्च, २०२६ अखेर खर्चास मान्यता देण्यात देणे. जिल्हा वार्षिक योजना सन २०२६-२७ (सर्वसाधारण योजना, आदिवासी उपयोजना, अनुसूचित जाती उपयोजना) च्या खर्चाचे नियोजनावर चर्चा करण्यात आली.

### आजपासून २१ जूनपर्यंत टप्प्याटप्प्याने...

**कोणत्या भागात कधी पाणीपुरवठा बंद राहणार?**

१२ जून २०२६ आणि १७ जून २०२६ – नेतिवली जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार असून, याचा फटका डोंबिवली (पूर्व) येथील एफ आणि जी प्रभागातील नागरिकांना बसणार आहे.

१३ जून २०२६ आणि १८ जून २०२६ – बारावे जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. त्यामुळे कल्याण (पूर्व) येथील डी आणि ई प्रभाग, तसेच कल्याण (पश्चिम) येथील गोदरेज हिल, के प्रभागातील पार नाका आणि सुभाष मैदान टाकी परिसर प्रभावित होणार आहे.

१४ जून २०२६ आणि १९ जून २०२६ – नेतिवली जलशुद्धीकरण केंद्र बंद राहणार असल्याने डोंबिवली (पश्चिम) येथील एच प्रभागातील पाणीपुरवठा खंडित राहील.

१५ जून २०२६ आणि २० जून २०२६ – बारावे जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार असून, कल्याण (पश्चिम) येथील बी आणि के प्रभागातील नागरिकांना याचा फटका बसणार आहे.

१६ जून २०२६ आणि २१ जून २०२६ – मोहिली जलशुद्धीकरण केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहील. त्यामुळे मांडा-टिटवाळा, वडवली, आंबिवली, शहाड, अटाळी आणि कल्याण ग्रामीण विभागातील इतर गावे, तसेच बी प्रभागातील योगीधाम, मिलिंद नगर, बिर्ला कॉलेज परिसर, चिकणघर, मुरबाड रोड परिसर आणि डी प्रभागातील वालधुनी परिसरातील पाणीपुरवठा प्रभावित होणार आहे.

**नागरिकांना आवाहन**

महापालिकेने स्पष्ट केले आहे की, ज्या दिवशी पाणीपुरवठा बंद राहणार आहे त्या दिवशी रात्री १२ ते पुढील रात्री १२ वाजेपर्यंत पूर्ण २४ तास पाणीपुरवठा बंद असेल. नागरिकांनी आवश्यक तेवढेच पाणी साठवून ठेवावे आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन केडीएमसीकडून करण्यात आले आहे.

### 'मेडिसिटी'द्वारे जागतिक दर्जाची...

आरोधन हेल्थ सिटीच्या डॉ. सलोनी पटवर्धन याही क्लीव्हलँड येथे उपस्थित होत्या.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "आज झालेल्या सामंजस्य करारातून ही भागीदारी भारतातील आरोग्य सेवांच्या क्षेत्रातील परिवर्तनकारी प्रवासाची सुरुवात आहे. जगातील सर्वात प्रतिष्ठित आरोग्य संस्थांपैकी एक असलेल्या क्लीव्हलँड क्लिनिकने महाराष्ट्रासोबत या उपक्रमात भागीदारी करण्याचा निर्णय घेतल्याचा आम्हाला अभिमान आहे. डॉ. मिहाल्जेविक यांच्या नेतृत्वाखालील संपूर्ण क्लीव्हलँड क्लिनिक नेतृत्वाचे तसेच विशेषत: डॉ. समीर कपाडिया आणि लक्ष्मी मित्तल यांचे या उपक्रमाला पुढे नेण्यासाठी मुख्यमंत्री फडणवीस यांनी आभार मानले."

भारताचे पहिले जागतिक स्तरावरील आरोग्य सेवा, संशोधन, वैद्यकीय शिक्षण आणि वैद्यकीय पर्यटन केंद्र म्हणून संकल्पित करण्यात आलेली नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळालगत सुमारे २५० एकर क्षेत्रावर विकसित केली जाणार आहे.

प्रस्तावित भागीदारीनुसार, क्लीव्हलँड क्लिनिक या प्रकल्पाची प्रमुख संस्था म्हणून कार्य करेल. अत्युच्च दर्जाची आरोग्य सेवा, वैद्यकीय शिक्षण, संशोधन, नवोन्मेष आणि रुग्णकेंद्रित आरोग्य सेवा पुरविण्यातील जागतिक अनुभव या प्रकल्पासाठी उपलब्ध करून दिला जाईल. या प्रकल्पातून सुमारे १.२ अब्ज अमेरिकी डॉलरची गुंतवणूक आकर्षित होण्याची आणि १०००० हून अधिक थेट रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा आहे.

एनएमआयएमसीची संकल्पना केवळ आरोग्य सेवा पुरविण्यापुरती मर्यादित नाही. या परिसंस्थेमध्ये जागतिक दर्जाची रुग्णालये, वैद्यकीय आणि परिचारिका शिक्षण संस्था, क्लिनिकल संशोधन केंद्रे, जैवतंत्रज्ञान आणि जीवन विज्ञान सुविधा, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित आरोग्य सेवा नवोन्मेष, वेलनेस पायाभूत सुविधा आणि संबंधित आरोग्य सेवा एकाच सहयोगी कॅम्पसमध्ये विकसित करण्यात येणार आहेत. मेडिसिटीभोवती विकसित होणाऱ्या व्यापक नवोन्मेष परिसंस्थेचा भाग म्हणून, लक्ष्मी एन. मित्तल यांनी स्थापन केलेल्या एलएनएमआयआयटी, जयपूरने क्लीव्हलँड क्लिनिक आणि एनएमआयएमसीसोबत संशोधन पायाभूत सुविधा, प्रगत तंत्रज्ञान क्षमता आणि शैक्षणिक कौशल्य उपलब्ध करून अत्याधुनिक आरोग्य सेवा नवोन्मेष, ट्रान्सलेशनल रिसर्च, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि प्रिसिजन मेडिसिन उपक्रमांना पाठबळ देण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दर्शविली आहे. क्लीव्हलँड क्लिनिकचे मुख्य कार्यकारी अधिकारी आणि अध्यक्ष डॉ. टॉम मिहाल्जेविक म्हणाले, "क्लीव्हलँड क्लिनिक जगभरातील धोरणात्मक भागीदारीद्वारे रुग्णसेवा, वैद्यकीय शिक्षण आणि संशोधन क्षेत्रात प्रगती साधण्यासाठी कटिबद्ध आहे. एनएमआयएमसी हा भविष्यातील रुग्ण, आरोग्य व्यावसायिक आणि संशोधकांच्या गरजा पूर्ण करणाऱ्या दूरदर्शी आरोग्य परिसंस्थेत आमचे कौशल्य योगदान देण्याची संधी आहे. महाराष्ट्र शासन, ब्रुकफिल्ड आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भारतात क्लिनिकल उत्कृष्टता, नवोन्मेष आणि शिक्षणासाठी जागतिक दर्जाचे व्यासपीठ उभारण्यासाठी सहकार्य करताना आम्हाला आनंद होत आहे." ब्रुकफिल्डचे व्यवस्थापकीय भागीदार आणि आशिया पॅसिफिक विभागाचे रिअल इस्टेट प्रमुख अंकुर गुप्ता म्हणाले, "नवी मुंबई इंटरनॅशनल मेडिसिटी ही मोठ्या प्रमाणावर आर्थिक आणि सामाजिक परिणाम घडवून आणणारी पायाभूत सुविधा उभारण्याची एक अद्वितीय संधी आहे. महाराष्ट्र शासन, क्लीव्हलँड क्लिनिक आणि आरोधन हेल्थ सिटी यांच्यासोबत भविष्यातील अनेक पिढ्यांना लाभदायी ठरणारे जागतिक दर्जाचे आरोग्य सेवा केंद्र उभारण्याचा आम्हाला अभिमान आहे."

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor- Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# राज्यातील पहिल्या 'ॲपेक्स हब'चे काम ठप्प; आवश्यक निधीचा अभाव

नवी मुंबई (भावना जैन) : राज्य सरकारने गेल्या काही वर्षांत विविध विकास प्रकल्पांच्या घोषणा आणि भूमिपूजनाचा सपाटा लावला. मात्र अनेक प्रकल्पांसाठी आवश्यक निधीची तरतूदच केली नसल्याची धक्कादायक बाब उघड झाली. याचाच फटका राज्यातील पहिले 'ॲपेक्स इन्स्टिट्यूट हब' उभारण्याच्या महत्त्वाकांक्षी प्रकल्पालाही बसला असून निधीअभावी कळंबोली येथील या प्रकल्पाचे काम गेल्या वर्षभरापासून ठप्प आहे.

राज्य शासनाने लघु व मध्यम उद्योजक घडविण्यासाठी कळंबोली येथे राज्यातील पहिले ॲपेक्स इन्स्टिट्यूट हब उभारण्याचा प्रकल्प हाती घेतला. यासाठी सुमारे १,२०० कोटी रुपयांचा खर्च करण्याची जबाबदारी घेतली. सहा महिने या प्रकल्पाच्या बांधकामाची जोरदार सुरुवातही झाली. परंतु अचानक निधीअभावी 'ॲपेक्स इन्स्टिट्यूट हब' या प्रकल्पाचे काम ठप्प झाले. वर्षभरापासून हे काम बंद असून यावर उद्योग विभागातील ज्येष्ठ अधिकारी बोलायला तयार नाहीत. हा प्रकल्प मार्च २०२७ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होता.

मुख्यमंत्र्यांच्या अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्पांपैकी एक असणाऱ्या या प्रकल्पाचे वर्षभरात केवळ सात टक्के काम झाले आहे. नुकतेच मुख्यमंत्र्यांनी प्रकल्प वेळेत पूर्ण करण्याच्या सूचना प्रशासनातील अधिकाऱ्यांना दिल्या आहेत. मात्र उद्योजक घडविणारा महत्त्वाकांक्षी प्रकल्प का रखडला आहे, याचे उत्तर अद्याप दिले जात नाही.

उद्योग विभागाद्वारे राज्यातील युवक-युवतींना कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देऊन लघु व मध्यम उद्योग क्षेत्रासाठी सक्षम मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने हा प्रकल्प हाती घेण्यात आला होता. कळंबोलीतील मुंबई-पुणे यशवंतराव चव्हाण द्रुतगती महामार्गालगतच्या सुमारे साडेसहा एकर जागेवर हा प्रकल्प उभारण्यात येत आहे. या ठिकाणी निवासी सुविधा आणि माहिती तंत्रज्ञान विभागासह १३ मजली वाणिज्य संकुल उभारण्याचे



नियोजन करण्यात आले आहे. सदर भूखंड पूर्वी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळाच्या ताब्यात होता.

या ठिकाणच्या गोदामांमधून शासनाला दरमहा पाच ते सहा लाख रुपयांचे भाडे उत्पन्न मिळत होते. मात्र ॲपेक्स हब उभारण्यासाठी हा भूखंड महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे हस्तांतरित करण्यात आला.

प्रकल्पासाठी आवश्यक आराखडे आणि निविदा प्रक्रिया पूर्ण करून कामाचे कंत्राट दोन कंपन्यांना देण्यात आले. मार्च २०२४ ते मार्च २०२७ या कालावधीत प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन होते. सुरुवातीच्या सहा महिन्यांत कामाला वेग होता.

मात्र त्यानंतर कामाचा वेग मंदावत जाऊन गेल्या वर्षापासून प्रकल्पाची प्रगती जवळपास थांबली आहे.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये**

- नवउद्योजकांसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण
- लघु व मध्यम उद्योगांसाठी व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रम
- उद्योगनिहाय कौशल्य विकास केंद्र
- प्रत्यक्ष उद्योग प्रशिक्षण सुविधा
- स्टार्टअप्ससाठी मार्गदर्शन व मेंटरशिप केंद्र
- नव्या उद्योगांना सुरुवातीच्या टप्प्यात मदत करणारी व्यवस्था
- डेटा सेंटर
- ई-लायब्ररी
- प्रदर्शन व उत्पादन प्रदर्शन केंद्र
- राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी सहकार्याची व्यवस्था
- सुमारे २०० प्रशिक्षणार्थी व कर्मचाऱ्यांसाठी निवासी सुविधा.

" राज्य सरकारने पुढाकार घेऊन ॲपेक्स हबची घोषणा केली. मात्र या प्रकल्पातून लवकरच कुशल कामगार व नवउद्योजक घडले पाहिजेत. यासाठी सरकारने अशा प्रकल्पांना कायम प्राधान्य देणे गरजेचे आहे.

संदीप डोंगरे, उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्य एक्सपोर्ट फ्रीशरीज कंपनी

" राज्याचे अर्थमंत्री असताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रकल्पाची घोषणा अर्थसंकल्पात केली होती. मात्र प्रकल्पासाठीचा निधी उद्योग विभागामार्फत उपलब्ध करून द्यायचा की थेट शासनाकडून याबाबत तांत्रिक अडचणी निर्माण झाल्या. त्यामुळे हा प्रकल्प उच्चस्तरीय समितीकडे (एचपीसी) पाठविण्यात आला आहे. यासंदर्भात मुख्यमंत्र्यांशी दोन वेळा चर्चा झाली असून मुख्य सचिवांचीही भेट घेतली आहे. एचपीसीमार्फत तातडीने काम सुरू करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पुढील काही दिवसांत यावर तोडगा नक्की निघेल.

उदय सामंत, उद्योगमंत्री

# विजेच्या मागणीत ३० टक्क्यांनी वाढ; आढावा बैठकीत महावितरणकडून स्पष्ट

नवी मुंबई (धनश्री सट्टा) : गेल्या काही दिवसांपासून शहरातील अनेक भागांमध्ये वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याच्या तक्रारी वाढल्या असताना त्यामागे वाढलेली विजेची मागणी हे प्रमुख कारण असल्याचे महावितरणने स्पष्ट केले. उष्णतेची लाट, वाढलेली आर्द्रता आणि त्यातून वाढलेला वीज वापर यामुळे शहरातील विजेची मागणी तब्बल ३० टक्क्यांनी वाढली असून वितरण यंत्रणा क्षमतेच्या उच्च पातळीवर कार्यरत आहे. परिणामी भूमिगत एलटी केबल जाळ्यावर ताण वाढून अनेक भागांमध्ये वीजपुरवठा वारंवार खंडित होत असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. वाशी येथील सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये वनमंत्री तथा ऐरोलीचे आमदार गणेश नाईक यांच्या उपस्थितीत बुधवारी आयोजित बैठकीत महावितरणच्या अधिकाऱ्यांनी शहरातील



वीजपुरवठ्याचा आढावा घेतला. यावेळी गेल्या दहा ते पंधरा दिवसांपासून वाढलेल्या तक्रारींची कारणे आणि त्यावरील उपाययोजनांची माहिती देण्यात आली .महावितरणचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांनी बैठकीत दिलेल्या माहितीनुसार, नवी मुंबईतील सुमारे ८० टक्के वीज वितरण जाळे भूमिगत स्वरूपाचे आहे. उच्च दाबाच्या वाहिन्या आणि प्रमुख फीडरमध्ये कोणतीही मोठी अडचण नसली तरी कमी दाबाच्या (एलटी) केबल नेटवर्कमध्ये वाढत्या भारामुळे बिघाड वाढले आहेत. उष्णता आणि आर्द्रतेमुळे वातानुकूलित यंत्रणा, पाण्याचे पंप, रेफ्रिजरेटर आणि अन्य विद्युत उपकरणांचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. त्यामुळे नेहमीच्या तुलनेत विजेचा भार सुमारे ३० टक्क्यांनी वाढल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. गेल्या दोन आठवड्यांत ऐरोली, कोपरखैरणे, घणसोली, रबाळे तसेच पनवेल परिसरात एलटी केबल फॉल्टच्या अनेक घटना घडल्या आहेत. भूमिगत केबलमध्ये दोष निर्माण झाल्यानंतर त्याचे अचूक ठिकाण शोधणे, उत्खनन करणे आणि दुरुस्ती करणे ही वेळखाऊ प्रक्रिया असते. अनेकदा केबलमधील जॉइंटमध्ये गळती किंवा तांत्रिक बिघाड निर्माण झाल्याने पुरवठा विस्कळीत होतो. दोषग्रस्त ठिकाण शोधून दुरुस्ती करण्यासाठी साधारण दोन ते तीन तासांचा कालावधी लागत असल्याचे महावितरणने स्पष्ट केले.

# विरारच्या म्हाडा वसाहतीत पाण्याची समस्या; संतप्त नागरिकांचा महानगरपालिकेवर धडक मोर्चा!

विरार (सतीश सोनावणे) : विरार पश्चिमेच्या बोळींज येथे उभारण्यात आलेल्या म्हाडा वसाहतीत मागील काही दिवसांपासून कमी दाबाने पाणी पुरवठा केला जात आहे. त्यामुळे पाणी टंचाईची समस्या निर्माण होऊ लागली आहे. या समस्येने त्रस्त झालेल्या नागरिकांनी बुधवारी महापालिकेच्या मुख्यालयावर मोर्चा काढत आंदोलन केले.विरार पश्चिमेतील बोळींज येथे म्हाडा वसाहत उभारण्यात आली आहे. या वसाहतीत ९ हजार ५०० इतक्या सदनिका असून यातील ८ हजार ३०० सदनिकेत नागरिक वास्तव्यास आहेत. मात्र म्हाडा वसाहतीतील रहिवाश्यांना गेल्या अनेक दिवसांपासून विविध समस्यांचा सामना करावा लागत आहे.




महापालिकेने येथील नागरिकांना पाणी पुरवठा सुरू केला असला तरीही अत्यंत कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याने 'विरारच्या म्हाडा वसाहतीत पाणी टंचाईच्या समस्येला सामोरे जावे लागत असल्याचे येथील नागरिकांनी सांगितले आहे. रात्री साडेबारा वाजता पाणी येते सुरुवातीला दाब चांगला असतो मात्र काही क्षणातच या पाण्याचा दाब कमी होतो त्यामुळे नागरिकांना पुरेसे पाणी मिळत नाही तर दुसरीकडे महिन्यातून अनेकदा वीज पुरवठा खंडित किंवा तांत्रिक बिघाडाचे कारण देत पाणी पुरवठा बंद असतो असे म्हाडा संकुल समितीचे उपाध्यक्ष कृष्णा देवाडीगा यांनी सांगितले आहे .सातत्याने तक्रारी करूनही महापालिका आमच्या समस्येकडे दुर्लक्ष करीत असल्यानेबुधवारी महापालिकेच्या मुख्यालयावर मोर्चा काढत आंदोलन केले. यात हजारोंच्या संख्येने नागरीक सहभागी झाले होते .मोर्चानंतर आंदोलकांच्या एका शिष्टमंडळाने महापौर अजीव पाटील आणि महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांच्याशी सविस्तर चर्चा केली. ही चर्चा अत्यंत सकारात्मक वातावरणात पार पडली.

प्रशासनाने सर्व मागण्या ऐकून घेत त्यावर लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले असल्याचे म्हाडा वसाहतीतील नागरिकांनी सांगितले आहे.

# वाघोली शनी मंदिर उघड्या गटारांचा धोका

## महिन्याभरापासून अपघातांचे सत्र सुरूच

वसई (प्रथमेश चव्हाण) : नालासोपारा पश्चिमेतील वाघोली ते शनी मंदिर या रस्त्याच्या कडेला असणाऱ्या उघड्या गटारांमुळे नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अरुंद रस्त्यावर वाहने वळवताना तसेच वाहतूक कोंडीतून वाहन काढताना काही वाहनचालक गटारात पडले असल्याची माहिती रहिवाशांनी दिली आहे.नालासोपारा पश्चिमेतील वाघोली ते शनी मंदिर महत्त्वाचा वाहतुकीचा रस्ता गेला आहे. निर्मळ, वसई पश्चिम आणि महामार्गाला जोडणारा हा मुख्य रस्ता असल्यामुळे या रस्त्यावर वाहनांची मोठी वर्दळ असते .तसेच शनिवारी आणि रविवारी शनी मंदिरात दर्शन घेण्यासाठी येणाऱ्या भाविकांच्या वाहनांच्या दुतर्फा पार्किंगमुळे हा रस्ता अधिकच अरुंद होतो .तर या रस्त्याला लागूनच परिसरातील पाण्याचा निचरा होण्यासाठी तयार केलेली गटारं आहेत. पण, या गटारांवर स्लॅब नसल्यामुळे वाहनचालकांसाठी ती धोकादायक



ठरू लागली आहेत. महिन्याभरात काही वाहनचालक या गटारात पडल्याच्या घटना समोर आल्याचेही स्थानिक रहिवाशांनी सांगितले.

तर समस्येबाबत बोलताना स्थानिक रहिवासी अंकिता नाईक म्हणाल्या की, गेल्या चार ते पाच वर्षांपासून या गटारांवर स्लॅब टाकण्यात आलेला नाही. वारंवार तक्रार करूनही प्रशासनाकडून याकडे दुर्लक्ष केले जात आहे. मंगळवारी दुचाकी पार्क करताना माझे पती या गटारात पडले. त्यामुळे त्यांच्या खांद्याला, हाताला आणि पायाला गंभीर दुखापत झाली आहे.

# ट्रॉमा केअर सेंटरचे काम अंतिम टप्प्यात; प्रत्यक्षात कार्यरत होण्याकरिता अवधी लागणार

पालघर (सुचिता सोनावणे) : मनोर येथे २०० खाटांचे सामान्य रुग्णालय व २० खाटांचे ट्रॉमा केअर युनिटच्या बांधकामा संदर्भातील कामे अंतिम टप्प्यात असून जून महिन्याच्या अखेरीपर्यंत ही सर्व कामे पूर्ण होण्याच्या दृष्टीने आखणी करण्यात आली आहे. या केंद्रासाठी मनुष्यबळाची उपलब्धता होण्याच्या दृष्टीने पावले उचलण्यात आले असून वैद्यकीय उपचाराच्या दृष्टीने अंतर्गत तयारी पूर्ण करण्यासाठी जुलै महिन्याचा मध्य उजाडण्याची शक्यता आहे.

ट्रॉमा केअर सेंटरच्या मुख्य इमारतीचे आरसीसी बांधकाम ९७ टक्के पूर्ण झाले अजून मुख्य इमारतीच्या आतील व बाहेरील रंगकाम अंतिम टप्प्यात आहे. त्याचप्रमाणे शवागृहाचे काम, फर्निचर बसविण्याचे काम तसेच रुग्णालयाच्या प्रवेशद्वाराचे काम १५ जून पर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित करण्यात आले



आहे. याच बरोबरीने ऑपरेशन थिएटर मधील अंतर्गत कामे व अग्निप्रतिबंधक व्यावस्थेमधील दरवाजे बसविण्याचे काम देखील पूर्ण होण्याच्या टप्प्यात आहेत. रुग्णालयातील विविध विभागात आवश्यकतेनुसार फॉल्स सिलिंग बसवण्यात हे काम देखील जूनच्या तिसऱ्या आठवड्यापर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित आहे.

रुग्णालयाला पाणीपुरवठा करण्यासाठी अंडरग्राउंड टाकीपर्यंत जलवाहिनी टाकण्यात आली आहे. मात्र या मुख्य जलवाहिनीपासून रुग्णालयाकरिता जोडणी घेण्यासाठी महाराष्ट्र जल प्राधिकरण तर्फे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्याकडून परवानगी प्राप्त करून जलवाहिनी जोडण्याचे काम अपूर्ण राहिले आहेत.

विद्युतीकरणाचे काम प्रगतीपथावर असून या रुग्णालयात सोलर वॉटर हीटर सिस्टम बनवण्यात आलेली आहे. त्याचप्रमाणे सोलार ऑनग्रिड सिस्टम कार्यरत करण्यात येणार असून विद्युत उपकेंद्राचे काम तसेच रोहित्र बसवण्याचे काम पूर्ण झाले आहे. या रुग्णालयाला विद्युत जोडणी व मीटर बसवण्याचे काम प्रगतीपथावर असून त्यानंतर रुग्णालयात असणारे ११ उद्ववाहक (लिफ्ट) ही चाचणी पूर्ण होऊन परवानगी मिळवण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यत येणार आहे. रुग्णालयात सीसीटीव्ही यंत्रणा बसवण्यात आली असून बसवण्यात आलेल्या आग प्रतिबंधक उपाययोजना परवानगी मिळवण्याची प्रक्रिया सुरू आहे. या रुग्णालयाच्या कामकाजाच्या दृष्टीने सर्व स्थापत्य, विद्युत व पाणीपुरवठा विभागाची संबंधित कामे जून अखेरीपर्यंत पूर्ण करण्याचे नियोजित करण्यात आले आहे.


मनोर येथील ग्रामीण रुग्णालय टप्प्याटप्प्यात या ट्रॉम केअर सेंटरमध्ये स्थलांतरित करण्याचे नियोजित असल्याने त्या ठिकाणी असणारे मनुष्यबळ तसेच वैद्यकीय उपकरणे या नवीन रुग्णालयात काही प्रमाणात वापरात येणार आहेत.

त्यामुळे किमान ग्रामीण रुग्णालय स्तरावरील औषधोपचार व सेवा देण्यासाठी आवश्यक ती तयारी पूर्ण झाल्यानंतर अंतर्गत तयारी व जुळवा जुळवी करून जुलै महिन्याच्या मध्याच्या सुमारास ट्रॉमा केअर सेंटर कार्यरत होण्याची शक्यता दिसून येत आहे.

# परप्रांतीय चालकाच्या मारहाणीत जखमी झालेल्या दस्तूर यांच्या प्रकृतीची राज ठाकरे, श्रीकांत शिंदे यांच्याकडून विचारणा

ठाणे (सम्यक कासारे) : थुंकल्याचा जाब विचारल्याने ७६ वर्षीय सरोश दस्तूर यांना एका परप्रांतीय प्रवासी वाहन चालकाने बेदम मारहाण केली होती. या मारहाणीनंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांनी मोबाईल कॉलद्वारे दस्तूर यांना संपर्क साधून त्यांच्या प्रकृतीची विचारणा केली. तसेच, त्यांना प्रकृतीची काळजी घेण्याचे आवाहन केले.

कॅडबरी जंक्शन येथील ज्युपिटर रुग्णालय परिसरातील गृहसंकुलात दस्तूर हे त्यांच्या पत्नीसोबत वास्तव्यास आहे. ते पारशी समाजाचे असून मंगळवारी रात्री ते पत्नीसोबत पायी जात होते. त्याचवेळी प्रवासी वाहन कार चालक निशांत शुक्ला हा त्याच्या कारमधून बाहेर थुंकला. हा प्रकार दस्तूर यांनी बघितल्यानंतर त्यांनी कार



चालकाला थुंकू नको असे सांगितले. त्यामुळे निशांत याने त्यांना शिवीगाळ तसेच मारहाण करण्यास सुरुवात केली. निशांत याने दस्तूर यांना दगड हातात घेऊन मारहण्याचा देखील प्रयत्न केला.

हा सर्व प्रकार मोबाईल कॅमेऱ्यामध्ये चित्रीत करण्यात आला होता. हे चित्रीकरण समाजमाध्यमावर प्रसारित झाल्यानंतर ठाकरे गट आणि शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनी निशांत याचा शोध घेऊन त्याला पोलिसांच्या ताब्यात दिले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्याने शिंदे गटाचे पदाधिकारी नितेश पाटोळे यांनी याप्रकरणी तक्रार दाखल केली आहे. सरोश यांना उपचारासाठी ठाण्यातील ज्युपिटर रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. गुरुवारी दुपारी मनसेचे नेते अविनाश जाधव हे त्यांना भेटले.

अविनाश जाधव यांनी मनसेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्यासोबत मोबाईलद्वारे त्यांच्याशी संभाषण करुन दिले. तर शिंदे गटाच्या पदाधिकाऱ्यांनीही दस्तूर यांची भेट घेऊन खासदार श्रीकांत शिंदे यांच्यासोबत व्हिडीओ कॉल द्वारे संपर्क साधून दिला. प्रवासी वाहतूक कार चालक निशांत शुक्ला हा कारमधून बाहेर थुंकला. त्यास वृद्ध व्यक्तीने थुंकू नको असे म्हटल्याने कार चालकाने त्यांना शिवीगाळ करण्यास सुरुवात केली.



ठाणे : घरगुती गॅस सिलेंडर मिळविण्यासाठी एजन्सीसमोर ग्राहकांची गर्दी

# बालपणाला मुक्त श्वास देऊया

दि. १२ जून हा दिवस जगभरात 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून साजरा केला जातो. बालपण हे प्रत्येक मुलाच्या आयुष्यातील सर्वात निरागस, आनंददायी आणि घडणारा काळ असतो. या काळात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि स्वप्नांची रंगीत दुनिया असायला हवी; परंतु वास्तव मात्र यापेक्षा खूप वेगळे आहे. जगातील कोट्यवधी मुले आजही गरिबी, सामाजिक विषमता, अशिक्षितपणा आणि विविध प्रतिकूल परिस्थितींमुळे शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत आहेत. त्यांच्या कोवळ्या हातात पेनऐवजी विटा, कचऱ्याच्या पिशव्या, चहाचे ग्लास किंवा कारखान्यातील धोकादायक साधने दिली जात आहेत. ही परिस्थिती केवळ त्या मुलांच्या भविष्यावरच परिणाम करणारी नाही, तर संपूर्ण समाजाच्या विकासालाही अडथळा निर्माण करणारी आहे. म्हणूनच बालमजुरीविरोधी जागतिक दिनाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते.

बालमजुरी ही केवळ आर्थिक समस्या नसून ती सामाजिक, नैतिक, शैक्षणिक आणि मानवी हक्कांशी संबंधित गंभीर समस्या आहे. जेव्हा एखाद्या मुलाला त्याच्या वयानुसार शिक्षण, खेळ, आरोग्य आणि सुरक्षित वातावरणापासून वंचित ठेवून उपजीविकेसाठी काम करण्यास भाग पाडले जाते, तेव्हा ती बालमजुरी ठरते. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेच्या व्याख्येनुसार अशी कोणतीही कामे जी मुलांच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक किंवा नैतिक विकासासाठी घातक ठरतात आणि त्यांच्या शिक्षणात अडथळा निर्माण करतात, ती बालमजुरी मानली जातात. बालमजुरीमुळे मुलांचे बालपण हिरावले जाते, त्यांचे शिक्षण अर्धवट राहते आणि त्यांचे आयुष्य गरिबीच्या दुष्टचक्रात अडकून पडते.

बालमजुरीचा इतिहास मानवजातीच्या औद्योगिक विकासाशी निगडित आहे. औद्योगिक क्रांतीच्या काळात कारखान्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर बालकामगारांचा वापर केला जात असे. कमी वेतनात, जास्त वेळ आणि कोणतीही सुरक्षा नसताना मुलांकडून काम करून घेतले जात असे. कालांतराने समाजसुधारक, मानवाधिकार संघटना आणि विविध देशांच्या सरकारांनी बालमजुरीविरोधात आवाज उठवला. कामाच्या ठिकाणी मुलांचे होणारे शोषण रोखण्यासाठी विविध कायदे करण्यात आले. या चळवळीचा एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे २००२ साली आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने १२ जून हा दिवस 'बालमजुरीविरोधी जागतिक दिन' म्हणून घोषित केला. या दिवसाचे उद्दिष्ट बालमजुरीविषयी जनजागृती करणे, बालकामगारांच्या समस्यांकडे जगाचे लक्ष वेधणे आणि बालमजुरी निर्मूलनासाठी प्रभावी उपाययोजना राबविण्यास प्रोत्साहन देणे हे आहे.

जगभरातील बालमजुरीचे स्वरूप विविध प्रकारचे आहे. काही मुले शेतीच्या कामात गुंतलेली असतात, तर काही कारखाने, हॉटेल्स, चहाच्या टपऱ्या, बांधकाम क्षेत्र, खाणी, घरगुती कामे, कचरा वेचणे किंवा रस्त्यावरील विक्री यांसारख्या क्षेत्रांत काम करतात. काही ठिकाणी मुलांना सक्तीची मजुरी करावी लागते, तर काही मुलांना मानवी तस्करीद्वारे कामासाठी विकले जाते. विशेषत: धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होतात. रसायनांचा संपर्क, धूळ, आवाज, अवजड यंत्रसामग्री आणि अपुरी सुरक्षा यामुळे त्यांना विविध आजारांना सामोरे जावे लागते. अनेकदा अपघातांमुळे त्यांचे कायमस्वरूपी अपंगत्वही येते.

बालमजुरीची कारणे अनेकांगी आहेत. गरिबी हे त्यामधील प्रमुख कारण मानले जाते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांमध्ये मुलांच्या कमाईला कुटुंबाच्या उत्पन्नाचा एक भाग म्हणून पाहिले जाते. शिक्षणाचा खर्च, बेरोजगारी, कर्जबाजारीपणा आणि अपुरी सामाजिक सुरक्षा यामुळे पालक मुलांना कामावर पाठवतात. अशिक्षित पालकांना शिक्षणाचे महत्त्व समजत नाही आणि तात्पुरत्या आर्थिक गरजांपुढे मुलांच्या भवितव्याकडे दुर्लक्ष होते. काही भागांत सामाजिक रूढी, लिंगभेद आणि पारंपरिक व्यवसायांची सक्ती यांमुळेही बालमजुरी वाढीस लागते. मुलींना घरगुती कामे किंवा घरकामासाठी इतरांकडे पाठविण्याच्या घटनाही मोठ्या प्रमाणात आढळून येतात.

शिक्षणाचा अभाव आणि बालमजुरी यांचे घनिष्ठ नाते आहे. जी मुले शाळेबाहेर राहतात, त्यांना बालमजुरीच्या विळख्यात अडकण्याची शक्यता अधिक असते. दुसरीकडे, जेव्हा मुले काम करू लागतात, तेव्हा त्यांचे शिक्षण खंडित होते. अशा प्रकारे गरिबी, अशिक्षण आणि बालमजुरी यांचे दुष्टचक्र तयार होते. या दुष्टचक्रातून बाहेर पडण्यासाठी सर्वसमावेशक आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण अत्यंत आवश्यक आहे. शाळांमध्ये आकर्षक वातावरण, मोफत शैक्षणिक सुविधा, पौष्टिक आहार योजना आणि पालकांमध्ये जागृती निर्माण केल्यास बालमजुरीचे प्रमाण कमी होऊ शकते.

भारतात बालमजुरी ही चिंतेची बाब राहिली आहे. देशाने आर्थिक प्रगती केली असली, तरी अनेक सामाजिक आणि आर्थिक विषमतांमुळे बालमजुरी पूर्णतः नष्ट झालेली नाही. ग्रामीण आणि शहरी दोन्ही भागांमध्ये बालकामगार आढळून येतात. काही मुले शेतीत काम करतात, तर काही लहान उद्योग, हॉटेल्स, वर्कशॉप्स, विटभट्ट्या आणि घरगुती उद्योगांमध्ये गुंतलेली असतात. शहरांमध्ये स्थलांतरित कुटुंबांतील मुलांवर बालमजुरीचे संकट अधिक तीव्रतेने दिसून येते. कोविड-१९ महामारीनंतर अनेक कुटुंबांच्या आर्थिक स्थितीवर विपरीत परिणाम झाल्याने काही भागांत बालमजुरीचे प्रमाण वाढण्याची भीती व्यक्त करण्यात आली होती.

भारतीय राज्यघटनेने बालकांच्या संरक्षणासाठी विविध तरतुदी केल्या आहेत. राज्यघटनेच्या कलम २४ नुसार चौदा वर्षांखालील मुलांना कारखाने, खाणी किंवा इतर धोकादायक उद्योगांमध्ये कामावर ठेवण्यास बंदी घालण्यात आली आहे. कलम २१-अ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील मुलांना मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार देण्यात आला आहे. राज्याच्या मार्गदर्शक तत्त्वांमधील कलम ३९ मध्ये मुलांच्या आरोग्याचे आणि विकासाचे संरक्षण करण्यावर भर देण्यात आला आहे. या घटनात्मक तरतुदी बालहक्कांच्या संरक्षणासाठी महत्त्वपूर्ण ठरतात.

भारतात बालमजुरी प्रतिबंधासाठी विविध कायदे अस्तित्वात आहेत. बालमजुरी (प्रतिबंध आणि नियमन) अधिनियम १९८६ आणि त्यामधील २०१६ मधील सुधारणा महत्त्वपूर्ण आहेत. या कायद्यानुसार चौदा वर्षांखालील मुलांना कोणत्याही व्यवसायात रोजगार देण्यास बंदी घालण्यात आली आहे. तसेच चौदा ते अठरा वर्षे वयोगटातील किशोरांना धोकादायक उद्योगांमध्ये काम करण्यास मनाई करण्यात आली आहे. शिक्षणाचा हक्क कायदा, किशोर न्याय कायदा आणि मानवी तस्करीविरोधी तरतुदी देखील बालमजुरीविरोधातील लढ्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. तथापि, केवळ कायदे पुरेसे नसून त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.

बालमजुरीचा मुलांच्या शारीरिक आरोग्यावर गंभीर परिणाम होतो. वाढत्या वयात अति श्रम केल्यामुळे त्यांच्या शरीराची योग्य वाढ होत नाही. कुपोषण, अशक्तपणा, श्वसनविकार, त्वचारोग आणि दृष्टिदोष यांसारख्या समस्या उद्भवतात. धोकादायक उद्योगांमध्ये काम करणाऱ्या मुलांना रसायनांच्या संपर्कामुळे दीर्घकालीन आजार होऊ शकतात. अपुऱ्या विश्रांतीमुळे आणि अस्वच्छ वातावरणामुळे त्यांची रोगप्रतिकारक शक्ती कमी होते.

बालमजुरीचे मानसिक परिणामही तितकेच गंभीर असतात. बालपणात सतत कामाचा ताण, मारहाण, अपमान आणि शोषण यांचा सामना करणाऱ्या मुलांमध्ये नैराश्य, भीती, आत्मविश्वासाचा अभाव आणि सामाजिक अलिप्तता निर्माण होऊ शकते. काही मुलांना भावनिक आधार मिळत नसल्याने त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास खुंटतो. बालमजुरीमुळे त्यांच्यातील सर्जनशीलता, जिज्ञासा आणि स्वप्न पाहण्याची क्षमता कमी होत जाते. बालमजुरी ही मुलांच्या मूलभूत मानवी हक्कांचे उल्लंघन आहे. प्रत्येक मुलाला शिक्षण, आरोग्य, सुरक्षितता, संरक्षण आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. बालहक्कांसंदर्भातील संयुक्त राष्ट्रसंघाच्या करारामध्ये मुलांच्या सर्वांगीण विकासावर भर देण्यात आला आहे. बालमजुरी या हक्कांना बाधा आणते आणि मुलांना त्यांच्या क्षमतांचा पूर्ण विकास करण्यापासून रोखते. त्यामुळे बालमजुरीविरोधातील लढा हा मानवी प्रतिष्ठेच्या संरक्षणासाठी आवश्यक आहे.बालमजुरी निर्मूलनासाठी सरकार, स्वयंसेवी संस्था, उद्योगक्षेत्र, शैक्षणिक संस्था आणि सामान्य नागरिक यांचे संयुक्त प्रयत्न आवश्यक आहेत. सरकारने गरिबी निर्मूलनाच्या योजना प्रभावीपणे राबविणे, गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे आणि कायद्यांची काटेकोर अंमलबजावणी करणे गरजेचे आहे. स्वयंसेवी संस्था बालकामगारांची ओळख पटविणे, त्यांचे पुनर्वसन करणे आणि समाजामध्ये जागृती निर्माण करणे यामध्ये महत्त्वाची भूमिका बजावू शकतात. उद्योगक्षेत्राने पुरवठा साखळीमध्ये बालकामगारांचा वापर होणार नाही याची खात्री करणे आवश्यक आहे.

पालकांची भूमिकाही अत्यंत महत्त्वाची आहे. मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देणे, अल्पकालीन आर्थिक फायद्यापेक्षा त्यांच्या उज्ज्वल भविष्याचा विचार करणे आणि मुलांवरील कामाचा बोजा कमी करणे आवश्यक आहे. समाजानेही बालकामगारांकडे केवळ सहानुभूतीने न पाहता त्यांच्या समस्येच्या मुळाशी जाण्याचा प्रयत्न करायला हवा. घरगुती मदतनीस म्हणून किंवा लहान उद्योगांमध्ये बालकामगारांचा वापर टाळणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे.

माध्यमांची भूमिकाही महत्त्वपूर्ण ठरते. वृत्तपत्रे, दूरदर्शन, रेडिओ आणि सामाजिक माध्यमांच्या साहाय्याने बालमजुरीच्या समस्येकडे समाजाचे लक्ष वेधले जाऊ शकते. बालकामगारांच्या वास्तवाचे चित्रण करून जनजागृती केली जाऊ शकते. तसेच यशस्वी पुनर्वसनाच्या कथा समाजासमोर आणल्यास सकारात्मक बदल घडवून आणण्यास मदत होऊ शकते. शिक्षण हा बालमजुरीविरोधातील सर्वात प्रभावी उपाय मानला जातो. प्रत्येक मुलाला दर्जेदार, सर्वसमावेशक आणि आनंददायी शिक्षण मिळाल्यास बालमजुरीचे प्रमाण लक्षणीयरीत्या घटू शकते. शाळा सोडलेल्या मुलांना पुन्हा शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विशेष उपक्रम राबविणे आवश्यक आहे. कौशल्य विकास, समुपदेशन आणि आर्थिक सहाय्याच्या माध्यमातून बालकामगारांचे पुनर्वसन केले जाऊ शकते.बालमजुरीविरोधी जागतिक दिन आपल्याला केवळ समस्या दाखवून देत नाही, तर उपाययोजनांची दिशाही दाखवतो.

या दिवसानिमित्त आयोजित केले जाणारे जनजागृती कार्यक्रम, चर्चासत्रे, शालेय उपक्रम आणि मोहिमा समाजामध्ये सकारात्मक बदल घडविण्यास मदत करतात. मुलांचे बालपण सुरक्षित ठेवण्यासाठी सामूहिक बांधिलकी निर्माण करणे हे या दिवसाचे खरे उद्दिष्ट आहे.

आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या युगात मानवाने अभूतपूर्व प्रगती केली आहे; परंतु जर समाजातील एकही मूल शिक्षणापासून वंचित राहून मजुरी करण्यास भाग पडत असेल, तर आपल्या विकासाच्या संकल्पना अपूर्ण ठरतात. मुलांच्या हातात कामाची साधने नव्हे तर ज्ञानाची साधने असली पाहिजेत. त्यांना भयमुक्त, शोषणमुक्त आणि आनंदी बालपण मिळणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

बालमजुरी निर्मूलन हा केवळ सरकारचा कार्यक्रम नसून तो सामाजिक चळवळ बनला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या स्तरावर जागरूक राहून बालमजुरीच्या घटनांची माहिती संबंधित यंत्रणांना द्यावी. बालकामगारांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सहकार्य करावे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन बालपणाचे संरक्षण करण्यासाठी पुढाकार घेतल्यासच बालमजुरीमुक्त समाजाची निर्मिती शक्य होईल.

दि. १२ जूनचा हा दिवस आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे स्थान शाळेत आहे, कामाच्या ठिकाणी नाही. त्यांच्या चेहऱ्यावरचे हसू, डोळ्यांतील स्वप्ने आणि भविष्याबद्दलची आशा जपणे हीच खरी मानवता आहे. प्रत्येक मूल हे राष्ट्राची अमूल्य संपत्ती आहे. त्यांना सुरक्षित, सन्मानपूर्वक आणि संधींनी समृद्ध जीवन देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

बालमजुरीविरोधातील संघर्ष हा मुलांच्या अधिकारांसाठी, सामाजिक न्यायासाठी आणि अधिक संवेदनशील जगाच्या निर्मितीसाठीचा संघर्ष आहे. चला, या जागतिक दिनानिमित्त आपण सर्वजण अशी प्रतिज्ञा करूया की कोणत्याही मुलाचे बालपण मजुरीच्या ओझ्याखाली दबले जाणार नाही.

प्रत्येक मुलाला शिक्षण, संरक्षण, प्रेम आणि स्वप्न पाहण्याचे स्वातंत्र्य मिळेल. कारण बालपण वाचविणे म्हणजेच भविष्य वाचविणे होय.

डॉ. राजेंद्र बगाटे (लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)

# सुप्त मेजवानी: अदृश्य प्रदूषणाचा घास रोखणारा माझा एक कौटुंबिक प्रवास

'वेसॅकइंडिया'चा संस्थापक आणि 'प्रोजेक्ट आशायें'चा रचनाकार म्हणून काम करताना, माझ्या आयुष्याचं ध्येय एकाच गोष्टीभोवती फिरत राहिलं आहे—ते म्हणजे निसर्गाशी असलेलं आपलं नातं पुन्हा कसं सुदृढ करता येईल. आपल्या रोजच्या वर्तनातील छोट्या-छोट्या चुकांचा सखोल अभ्यास केल्यानंतर मला एका गोष्टीची जाणीव झाली, की पर्यावरण रक्षणाचे मोठे बदल कोणत्याही औद्योगिक कारखान्यांतून घडत नाहीत; ते आपल्या घरात, भारतीय कुटुंबव्यवस्थेच्या भावनिक मूल्यांमधून शांतपणे आकाराला येत असतात.

एका प्लॅस्टिकच्या बाटलीचा कचरा आपल्या पृथ्वीवर किती प्रचंड भार टाकतो, हे जर आपल्याला खऱ्या अर्थाने समजून घ्यायचं असेल, तर आपल्या संस्कृतीचा गाभा असलेल्या एका दृश्याकडे आपण वळायला हवं—ते म्हणजे आपल्या घरात माऊलीने अपार कष्टाने आणि प्रेमाने रांधलेलं अन्न!

### चुलीची ती मूक आसवे आणि अपार कष्ट

घरची इतर मंडळी जागी होण्याच्या खूप आधी, जेव्हा संपूर्ण घर शांत आणि गारठलेलं असतं, तेव्हा आपली आई किंवा आजी स्वयंपाकघरात हजर असते. पायांचे सांधे दुखत असतानाही त्या थंड फरशीवर बसून भाज्या चिरणे, चपातीसाठी कणीक मळणे आणि जड पाटा-वरवंट्यावरून सुगंधी मसाले हाताने वाटणे यात तिचे तास सरतात. तिच्या हातांवर गरम तेलाच्या जुन्या जखमांचे वण असतात; तव्याच्या अंगातून निघणाऱ्या धगीने तिचा चेहरा लालबुंद होतो आणि सरपणाच्या धुराने किंवा गॅसच्या उग्र वासाने तिच्या डोळ्यांतून पाण्याचे पाट वाहत असतात. पण तिच्या तोंडून कधीही तक्रारीचा अवाक्षर निघत नाही. ती तिची संपूर्ण जीवनऊर्जा, तिचा घाम, पूर्वजांकडून मिळालेली सुगरणविद्या आणि कुटुंबाच्या कष्टाच्या पैशातून आणलेला महिन्याचा किराणा... हे सगळं त्या एका जेवणात ओतत असते.

भारतीय संस्कृतीत अन्न हे केवळ पोट भरण्याचं साधन नाही; ते 'प्रसाद' आहे—ते त्या माऊलीच्या जिवाचा तुकडा आहे, तिच्या मायेचं आणि त्यागाचं मूर्तिमंत रूप आहे. तिचं हे सगळं भावनिक आणि शारीरिक कृत्य त्या ताटात वाढलेल्या अन्नामध्ये कायमचं 'गुंफलं' (Embedded) जातं.

आता कल्पना करा, की घराpathच्या मंडळींनी जेवायला बसून त्या गरम चपातीचे केवळ दोन घास खाल्ले आणि उरलेली सगळी सुग्रास मेजवानी अत्यंत सहजपणे कचऱ्याच्या डब्यात खरकटी म्हणून ओतून दिली...त्या वेळी बेसिनपाशी उभ्या असलेल्या आईच्या डोळ्यांत पाहिलंत, तर तिथे तुम्हाला एक मूक, काळीज पिळवटून टाकणारी वेदना दिसेल. तिच्या मायेचा, कष्टाचा आणि श्रमाचा तो एक मूक अपमान असतो. पण खरी शोकांतिका तर हा कचऱ्याचा डबा बंद झाल्यावर सुरू होते. ते मूळ अन्न फेकून दिल्यामुळे स्वयंपाकघर आवरता येत नाही आणि त्या माऊलीला विसावा घेता येत नाही. तिला तिच्या थकलेल्या, दुखणाऱ्या शरीराला पुन्हा ओढत चुलपाशी न्यावं लागतं, गॅस शेगडी पुन्हा पेटवावी लागते, आणखी महागडा एलपीजी गॅस जाळावा लागतो आणि केवळ कुटुंबाला उपाशी झोपवावं लागू नये म्हणून त्या कोंदट खोलीत पुन्हा तोच जीवघेणा धूर सहन करत नव्याने स्वयंपाक करावा लागतो.

धुराची ती दुसरी फेरी संपूर्णपणे 'टाळता येण्याजोगी' (Avoidable) होती. जर कुटुंबाने आधी वाढलेल्या अन्नाचा आदर केला असता, ते संपवलं असतं, तर ते स्वयंपाकघर स्वच्छ, थंड आणि शांत राहिलं असतं.जेव्हा मी घरातल्या या संवेदनशील परिस्थितीचा सखोल विचार केला, तेव्हा एक उद्विग्न करणारं सत्य समोर आलं: हाच तो रोजचा भावनिक आणि व्यावहारिक अन्याय आहे, जो आपण दररोज आपली 'धरती माता' असलेल्या निसर्गावर करत आहोत!

### विश्वाचे स्वयंपाकघर: प्लॅस्टिकमधील 'अदृश्य ऊर्जा'

आजच्या आधुनिक चंगळवादी संस्कृतीत आपण वापरत असलेल्या वस्तूंच्या बाबतीत कमालीचे आंधळे आणि भावनाशून्य झालो आहोत. जेव्हा मी हातामध्ये एक साधी, रिकामी प्लॅस्टिकची पाण्याची बाटली धरतो, तेव्हा ती अगदी हलकी, निर्जीव आणि कवडीमोलाची वाटते—एक निरुपयोगी कचरा, ज्याला चुरा करून फेकून देताना आपण दुसरा विचारही करत नाही.

पण जेव्हा मी स्वयंपाकघरातील त्या मेजवानीचा न्याय या बाटलीला लावतो, तेव्हा त्यामागील अदृश्य सत्य समोर येतं आणि ते थक्क करणारं आहे. माझ्या हातात आता केवळ कचरा नाही; तर धरती मातेने आपल्या गर्भात लाखो वर्षे शिजवून, साठवून आणि जोपासून तयार केलेलं खनिज तेल (Crude Oil) मी हाताळत असतो. त्या मौल्यवान तेलाचे रूपांतर आपण १० मिनिटांत पाणी पिऊन फेकून देतो त्या एका बाटलीत करण्यासाठी, एका कारखान्याला प्रचंड प्रमाणात 'अदृश्य' वीज खर्च करावी लागते—एखादा लॅपटॉप सलग २७३ तास चालवण्यासाठी जेवढी वीज लागते, तेवढी ऊर्जा त्या एका बाटलीमध्ये सामावलेली असते. हाच त्या बाटलीचा 'अंतर्भूत ऊर्जेचा' (Embedded Energy) पदर आहे.

जेव्हा आपण ती बाटली कचऱ्याच्या डब्यात फेकतो, तेव्हा आपण कृतघ्नतेची परिसीमा गाठत असतो. आपण धरती मातेच्या तोंडावर सांगत असतो की, तिच्या लाखो वर्षांच्या मूक, मातृत्वाच्या कष्टाची आपल्या नजरेत शून्य किंमत आहे. आपण तिचं समर्पण घेतो आणि दहा मिनिटांत ते उकिरड्यावर भिरकावून देतो.

ते प्लॅस्टिक आपल्या चक्रातून (Circular Loop) बाहेर पडल्यामुळे पुढील ५०० वर्षे ते जमिनीत तसंच पडून राहतं, मातीचा श्वास गुदमरवतं आणि आपल्या पाण्यात विषारी मायक्रोप्लॅस्टिक मिसळत राहतं. दुसरीकडे, आपली नवीन बाटल्यांची मागणी कधीच संपत नसल्यामुळे, जागतिक कारखान्यांच्या अजस्त्र भट्ट्या पुन्हा पेटवाव्या लागतात, पृथ्वीच्या पोटातून पुन्हा खनिज तेल उपसावं लागतं आणि आपण फेकून दिलेल्या बाटलीची जागा भरून काढण्यासाठी हवेत तब्बल २.५ किलो विषारी कार्बन वायू ($CO_2$) सोडावा लागतो.

कारखान्यातून निघणारा हा अवाढव्य धूर म्हणजेच 'टाळता येणारे प्रदूषण' (Avoidable Emission) होय. हा त्या औद्योगिक चुलीचा धूर आहे जी कधी पेटायलाच नको होती! आपण केवळ आपल्या निष्काळजीपणामुळे धरती मातेला तिचं रक्त सांडायला आणि स्वत:च्याच विषारी धुरात गुदमरायला भाग पाडत आहोत.

### खरकट्या अन्नातून समृद्धीकडे: सुजाण कुटुंबाची 'ती' सवय

याच अंत:करणाला भिडणाऱ्या जाणिवेने मला 'प्रोजेक्ट आशायें' (Project Aashayein) साकारण्याची आणि 'वेसॅकइंडिया'ची स्थापना करण्याची प्रेरणा दिली. मला एक अशी कार्यपद्धती निर्माण करायची होती, ज्याद्वारे आपली कुटुंबे आपल्या कचऱ्याकडे त्याच आदराने आणि सुजाणतेने पाहतील, ज्या आदराने ती घराचं बजेट सांभाळतात.

प्रत्येक पारंपरिक भारतीय मध्यमवर्गीय कुटुंबाला आपल्या साधनसंपत्तीचे मूल्य ठाऊक असते. शिल्लक राहिलेल्या चांगल्या अन्नाचे काय करायचे, हे आपल्या मातांनी आपल्याला शिकवले आहे—ते फेकून देणे हा 'अन्नदात्या'चा अपमान आहे. आपण ते फेकून देत नाही. आपण ते सुरक्षितपणे फ्रिजमध्ये ठेवतो आणि दुसऱ्या दिवशी अगदी प्रेमाने त्याचा कायापालट करून एका चवदार पदार्थात करतो—रात्रीच्या साध्या भाताचा दुसऱ्या दिवशी सुगंधी 'पुलाव' बनवला जातो. हे अन्न पुन्हा गरम करण्यासाठी किंवा नवीन रूपात आणण्यासाठी मूळ स्वयंपाकाच्या तुलनेत अगदी नगण्य वेळ, पैसा आणि गॅस लागतो.

### हाच तो मेकॅनिकल रिसायकलिंगचा (Mechanical Recycling) चमत्कार आहे!

जेव्हा आपण प्लॅस्टिकची बाटली स्वच्छ, वेगळी आणि सुरक्षित ठेवतो आणि ती एका अधिकृत रिसायकलिंग चक्रात पोहोचते, तेव्हा आपण तिची अंतर्भूत ऊर्जा जिवंत ठेवत असतो. आपण पृथ्वीचे लचके तोडणाऱ्या त्या रासायनिक उत्खननाच्या प्रक्रियेला पूर्णपणे वळसा घालतो. रिसायकलिंग केंद्र आपल्या त्या स्वच्छ प्लॅस्टिकच्या 'खरकट्या' गोळा करतं, त्यांना हळुवारपणे वितळवतं आणि त्यातून नवीन धागा, कपडे किंवा उपयुक्त वस्तू बनवतं. कचरा व्यवस्थापनाचे हे छोटेसे पाऊल तब्बल ७५% औद्योगिक ऊर्जा वाचवते आणि गोळा केलेल्या प्रत्येक किलो प्लॅस्टिकमागे आपल्या हक्काच्या आकाशातून १.६ किलो विषारी कार्बनचा धूर कायमचा पुसून टाकते. हा आपला धरती मातेला सांगण्याचा मार्ग आहे: "आम्ही तुमचे कष्ट पाहत आहोत, आणि आम्ही ते वाया जाऊ देणार नाही."

### नवीन पिढीसाठी 'सहानुभूतीचा' वारसा

आपली मुले आपण काय उपदेश करतो यातून शिकत नाहीत, तर आपण कश्याला मूल्य देतो यातून शिकतात. जर एका लहान मुलाने आपल्याला अर्धी भरलेली पाण्याची बाटली गाडीच्या खिडकीतून बाहेर फेकताना किंवा सगळ्या कचऱ्यात एकत्र टाकताना पाहिले, तर ते नकळत 'वापरा आणि फेका' (Disposability) संस्कृती शिकत असते. ते केवळ प्लॅस्टिक फेकायला शिकत नाही, तर ज्या गोष्टीचा किंवा व्यक्तीचा उपयोग संपला आहे, मग ते साधन असो, नातेसंबंध असो वा घरातील वृद्ध... त्यांना आयुष्यातून सहजपणे वगळण्याची घातक वृत्ती ते शिकत असतात.

आपल्याला पुढच्या पिढीला प्रत्येक वस्तूच्या मागे असलेलं 'अदृश्य हृदय' पाहायला शिकवायला हवं. जेव्हा एखाद्या बालकाला हे समजेल की, त्याने वाचवलेली एक बाटली त्याच्या अभ्यासाची खोली कित्येक तास प्रकाशमान ठेवू शकते, तेव्हा पर्यावरण रक्षण हा पुस्तकातला रट्टा मारण्याचा धडा राहत नाही. तो एक जिवंत, संवेदनशील आणि आदराचा संस्कार बनतो. हा तोच पूर्वजांचा वारसा आहे जो आपल्याला शिकवतो की, जमिनीवर पडलेल्या धान्याच्या कणालाही वंदन करून कपाळाला लावायचं आणि झाडाचं पान तोडण्यापूर्वीही तिची क्षमा मागायची.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी आपल्याला जगातील कोणत्या मोठ्या तंत्रज्ञानाची वाट पाहण्याची गरज नाही. हा बदल त्याच क्षणी घडतो जेव्हा आपण वस्तूच्या बाह्य रूपाच्या पलीकडे जाऊन त्यातील 'अदृश्य नैसर्गिक मूल्य' ओळखतो आणि धरतीला नव्याने कष्ट करायला लावण्याचे थांबवतो. जेव्हा आपण आपल्या घरातील संस्कारांची नाळ जगाच्या बजेटशी जोडतो, तेव्हा आपण तो टाळता येणारा धूर रोखतो, निसर्गाच्या जखमांवर फुंकर घालतो आणि आपली मुले, आपले समाज आणि आपली धरती माता यांना मोकळा, शुद्ध श्वास घेण्यास मदत करतो.

### रसिक वाचकहो, माझा तुम्हाला एक प्रश्न...

एका साध्या बाटलीचा हा अदृश्य आणि भावनिक प्रवास पाहिल्यानंतर, आता विचार करण्याची आणि निवड करण्याची जबाबदारी तुमची आहे. मी तुम्हाला विचारू इच्छितो:तुम्ही यापुढेही त्या रिकाम्या बाटलीकडे एक वजनाने हलका, कवडीमोलाचा कचरा म्हणूनच पाहणार आहात, ज्याला कुठेही फेकून देता येईल?की तुम्ही तिला धरती मातेचे लाखो वर्षांचे श्रम वाहून आणणारे एक मौल्यवान साधन मानणार आहात—ज्याची काळजी घेतली पाहिजे, ज्याला स्वच्छ ठेवून पुन्हा चक्रात पाठवले पाहिजे?आपल्या घरातील कचरा व्यवस्थापनाचे प्रत्येक छोटे पाऊल हे आपल्या मुलांच्या भविष्याला प्रदूषणाच्या धुरापासून वाचवणारी एक ढाल आहे.

विजयकुमार कट्टी

# तप विश्वास, विकास आणि जनसहभागाचे!





तब्बल १२ वर्षे म्हटले की आपण सवयीने एक तप असे म्हणतो. तप या शब्दातच तावून-सुलाखून निघण्याचा संघर्ष आहे, ध्येयपूर्तीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न आणि लक्ष्यप्राप्तीसाठीचा संकल्प. पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांच्या नेतृत्वाचे एक तप पूर्ण झाले, असे म्हणतो तेव्हा तिन्ही कसोटीवर परीक्षण केले जाणे आवश्यक आहे.

तपश्चर्येला दोन बाजू असतात. ही तपश्चर्या समाजासाठी असली तर त्याचे फळ समाजालाच मिळते, समाजातील अनेक घटकांना त्याचा लाभ होतो. मोदीजींच्या या तपश्चर्येचे फळ म्हणजे भारतातील सर्वसामान्य माणसाच्या जीवनात आलेली अभूतपूर्व क्रांती आहे. मोदीजींची २०१४ ते २०२६ ही १२ वर्षांची वाटचाल अशाच एका परिवर्तनकारी युगाची साक्ष देणारी आहे. ही केवळ सत्तेची बारा वर्षे नसून विश्वास, विकास, सुशासन, सांस्कृतिक पुनर्जागरण आणि जनकल्याण यांचा अभूतपूर्व संगम आहे.

आज आणखी एक विशेष बाब आहे, निर्वाचित पंतप्रधान म्हणून सलग ४३९९ दिवस मोदीजींनी पूर्ण केले. असे करताना त्यांनी पं. नेहरू यांचा विक्रम मोडला. नेहरूजी आणि मोदीजी यांची तुलनाच होऊ शकत नाही अशी वल्गना काही लोक करतील. नेहरूजी ज्या काळात प्रधानमंत्री झाले तेव्हा नेहरूजींना पर्याय नाही अशीच काहीशी भारतीय समाजाची मानसिकता होती, पण मोदीजी जेव्हा प्रधानमंत्री झाले तेव्हा लोक संवैधानिकदृष्ट्या प्रगल्भ झाले होते. त्यांना मतदानाचा अधिकार, त्याचे महत्त्व समजले होते. आपल्या आशा, आकांक्षा काय आहेत, याची जाणीव स्पष्ट झाली होती. सरकार लोककल्याणासाठीच आहे, हे त्यांना माहिती होते. अशा काळात मोदीजी यांचे सरकार आले होते, त्यामुळे जे काँग्रेसला ५०-६० वर्षांत जमले नाही ते करून दाखवण्याचे आव्हानच जनतेने त्यांच्या नेतृत्वाला भरभरून मते देऊन २०१४ मध्ये दिले आणि त्या आव्हानाला शिरोधार्य मानत मोदीजींचा 'सब का साथ-सब का विकास' हा प्रवास सुरू झाला. मग 'सब का विश्वास-सब का प्रयास' असे वेळोवेळी जोडले गेले. २०१४, २०१९ आणि २०२४ असे यशाचे टप्पे पार करीत ते आज भारताला वैश्विक नेतृत्व प्रदान करीत आहेत.

२०१४ आणि २०१९ मधील सुस्पष्ट जनादेशानंतर २०२४ मधील विजय हे केवळ निवडणुकीतील यश नव्हते, तर जनतेने विकास, सुशासन आणि स्थिर नेतृत्वावर व्यक्त केलेला पुनर्विश्वास होता. १९६२ नंतर सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपद मिळवणारे नरेंद्र मोदी हे देशातील पहिले नेते ठरले. जगातील अनेक लोकशाही व्यवस्था राजकीय अस्थिरतेशी झुंज देत असताना भारताने स्थैर्य, सातत्य आणि निर्णायक नेतृत्वाचा मार्ग निवडला. गेल्या दशकात मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने राजकीय स्थैर्याला विकासाची जोड दिली. आर्थिक सुधारणा, सामाजिक परिवर्तन, पायाभूत सुविधा विकास, राष्ट्रीय सुरक्षा आणि प्रभावी परराष्ट्र धोरण यामुळे भारत आज जागतिक स्तरावर अधिक सक्षम, आत्मविश्वासपूर्ण आणि प्रभावी राष्ट्र म्हणून उदयास आला आहे. २४ हून अधिक राष्ट्रांनी त्यांना दिलेले सर्वोच्च सन्मान ही त्याची पावती आहे.

हा फक्त एक नेतृत्वाचा प्रवास नव्हता, यामध्ये भारतीय जनता सहभागीदार होती हेच या प्रवासाचे वैशिष्ट्य आहे आणि फलित म्हणाल तर भारताची अर्थव्यवस्था दोन ट्रिलियन डॉलरवरून ४.१८ ट्रिलियन डॉलर! जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था. जगातील सर्वात वेगाने वाढणारी अर्थव्यवस्था. सामाजिक न्यायाची स्थापना करायची असेल तर आधी आपली आर्थिक बाजू समृद्ध असली पाहिजे, ही मोदीजींनी फक्त जाणले नाही तर त्यासाठी त्यांनी सर्व स्तरावर प्रयत्न केले. मेक इन इंडिया असो किंवा आत्मनिर्भर भारत असो, यांनी भारतीयांना आत्मविश्वास तर दिला पण भारतीय वस्तूंबद्दल जगामध्ये विश्वास जागवला. आज स्वदेशी शस्त्रास्त्रांची मागणी इतकी वाढली आहे की, पुढील दहा वर्षांचे उत्पादनही अपुरे पडेल. हीच आत्मनिर्भर भारताची खरी ताकद आहे.

देशातील १२ राज्यांमधून नक्षलवादाचा प्रभाव कमी करणे ही मोदी सरकारची ऐतिहासिक उपलब्धी आहे. अनेक दशकांपासून विकासापासून वंचित असलेल्या भागात आता विकासाची गंगा पोहोचत आहे. देशभरात २० कोटी लोक भीती आणि गरिबीच्या सावटाखाली जगत होते. नक्षलवादामुळे विकास पोहोचत नव्हता. हजारो युवकांचे जीवन उद्ध्वस्त झाले. पण आज परिस्थिती बदलत आहे. गडचिरोलीसारख्या भागात स्टील उद्योग उभे राहत आहेत. विद्यापीठे, मेडिकल कॉलेज, मोठ्या शैक्षणिक संस्था सुरू होत आहेत. कारण बंदुकीच्या आवाजावर विकासाच्या आवाजाने विजय मिळवला आहे.

गेल्या १२ वर्षांत भारताने पायाभूत सुविधांच्या विकासात अभूतपूर्व झेप घेतली आहे. राष्ट्रीय महामार्गांचे जाळे ९१ हजार किलोमीटरवरून सुमारे १.४६ लाख किलोमीटरपर्यंत विस्तारले. दररोज सरासरी ३४ किलोमीटर महामार्ग बांधले जात आहेत. ग्रामीण भारताच्या विकासासाठी प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत लाखो किलोमीटर रस्त्यांची उभारणी करण्यात आली. या रस्त्यांमुळे शेतकरी, विद्यार्थी आणि ग्रामीण नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल झाला आहे. रेल्वे क्षेत्रात ब्रॉडगेज विद्युतीकरण गतीने होत असून वंदे भारत एक्स्प्रेस, अमृत भारत स्टेशन योजना आणि आधुनिक रेल्वे स्थानकांमुळे भारतीय रेल्वेची ओळख बदलली आहे. मेट्रो नेटवर्क २४८ किलोमीटरवरून १,०९५ किलोमीटरपेक्षा अधिक वाढले आहे.

मोदी सरकारने 'अन्नदाता' शेतकऱ्याला विकासाच्या केंद्रस्थानी ठेवले. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे ११ कोटींहून अधिक शेतकऱ्यांना थेट आर्थिक सहाय्य देण्यात आले. सरकार स्थापन झाल्यानंतर तिसऱ्या कार्यकाळातील पहिली फाइलही शेतकरी कल्याणाशी संबंधित असल्याने सरकारची प्राथमिकता स्पष्ट झाली. प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेंतर्गत 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' अभियानामुळे लाखो हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले. कृषी उत्पादनात विक्रमी वाढ झाली असून भारत आज जगातील सर्वात मोठा दूध उत्पादक देश बनला आहे.

प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेद्वारे ८१ कोटी नागरिकांना मोफत धान्य पुरवण्यात आले. प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत ४ कोटींहून अधिक कुटुंबांना पक्की घरे मिळाली. उज्ज्वला योजनेमुळे ११ कोटी महिलांना मोफत गॅस जोडणी मिळाली. आयुष्मान भारत योजनेमुळे कोट्यवधी नागरिकांना मोफत आरोग्य संरक्षण मिळाले. जलजीवन मिशनमुळे १६ कोटींपेक्षा अधिक घरांपर्यंत नळाद्वारे स्वच्छ पाणी पोहोचले.

मोदी सरकारच्या धोरणांमध्ये महिलांना विशेष स्थान देण्यात आले. जनधन खात्यांमध्ये महिलांचा मोठा सहभाग आहे. 'लखपती दीदी' अभियानामुळे लाखो महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम झाल्या. सुकन्या समृद्धी योजना, मातृत्व लाभ, स्वयं-सहाय्यता गटांचे सक्षमीकरण आणि सशस्त्र दलांमध्ये महिलांच्या वाढत्या सहभागामुळे महिलांच्या नेतृत्वाखालील विकासाची संकल्पना प्रत्यक्षात उतरली आहे.मोदी सरकारच्या कार्यकाळात भारताने डिजिटल क्रांतीचा नवा इतिहास घडवला. जनधन, आधार आणि मोबाईल या माध्यमातून लाखो कोटी रुपये थेट लाभार्थ्यांच्या खात्यात पोहोचले. यूपीआय व्यवहारांमध्ये भारताने जागतिक नेतृत्व मिळवले आहे. भारतनेट प्रकल्पाद्वारे लाखो ग्रामपंचायतींना ऑप्टिकल फायबर नेटवर्कशी जोडण्यात आले आहे. डिजिटल गव्हर्नन्स, फेसलेस कर प्रणाली आणि जेम पोर्टलमुळे प्रशासन अधिक पारदर्शक आणि कार्यक्षम झाले आहे.

भारत आता जगाशी समानतेच्या नात्याने संवाद साधत आहे. भारताला व्यापार हवा आहे, गुंतवणूक हवी आहे, तंत्रज्ञान हवे आहे, पण आत्मसन्मान आणि स्वाभिमानाच्या आधारावर! रशिया-युक्रेन युद्धाच्या काळातही भारताने स्वत:चे राष्ट्रीय हित सर्वोच्च ठेवले. जगाच्या दबावाखाली न झुकता स्वतंत्र भूमिका घेण्याचे सामर्थ्य आज भारताने दाखवून दिले आहे.

आज भारत जगातील चौथी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनला आहे. 'मेक इन इंडिया', 'स्टार्टअप इंडिया' आणि 'पीएलआय' योजनांमुळे उत्पादन क्षेत्राला नवी गती मिळाली आहे. भारत जगातील दुसरा सर्वात मोठा मोबाईल उत्पादक देश बनला आहे. इलेक्ट्रॉनिक्स उत्पादनात अनेकपटीने वाढ झाली आहे. सेमीकंडक्टर उत्पादनासाठी मोठ्या गुंतवणुकी आकर्षित झाल्या असून भारत जागतिक उत्पादन केंद्र बनण्याच्या दिशेने वेगाने वाटचाल करीत आहे. स्टार्टअप संस्कृतीला मिळालेल्या प्रोत्साहनामुळे देशात दोन लाखांहून अधिक स्टार्टअप्स आणि शेकडो युनिकॉर्न निर्माण झाले आहेत.मोदी सरकारच्या १२ वर्षांत भारताने आपल्या सांस्कृतिक अस्मितेचा अभिमानाने पुनर्शोध घेतला आहे. अयोध्येतील प्रभू श्रीराम मंदिर, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, महाकाल लोक, केदारनाथ पुनर्विकास यासारख्या प्रकल्पांनी देशाच्या आध्यात्मिक चेतनेला नवी ऊर्जा दिली. छत्रपती शिवाजी महाराजांना नमन करीत आपली कारकीर्द सुरू करणाऱ्या मोदीजींनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित 'पंचतीर्थ', बिरसा मुंडा जयंतीला 'जनजातीय गौरव दिवस', सरदार पटेलांचा 'स्टॅच्यू ऑफ युनिटी', नेताजी सुभाषचंद्र बोस यांचा सन्मान, कर्तव्य पथ आणि नवीन संसद भवन हे राष्ट्रीय स्वाभिमानाचे प्रतीक बनले आहेत.

महाराष्ट्र तर सर्वाधिक लाभ मिळवणारे राज्य ठरले. महाराष्ट्राची प्रत्येक अडचण मोदीजींनी सोडविली. कोणताही प्रकल्प असो, त्याला लगेच मदत केली. इंदूमिल स्मारकाला जागा देणे असो, अमरावतीत टेक्सटाईल पार्क, वाढवणचे बंदर, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ, समृद्धी, अटलसेतू, कोस्टल रोड, मेट्रो अशा प्रत्येक प्रकल्पाच्या पाठीशी ते ठामपणे उभे राहिले.

आज भारताला जग केवळ मोठी बाजारपेठ म्हणून नव्हे तर जागतिक समस्यांवर उपाय सुचवणारा, विश्वासार्ह आणि जबाबदार देश म्हणून पाहत आहे. आजचा भारत आत्मविश्वासाने जगासमोर उभा आहे. विकसित भारत २०४७ चे स्वप्न साकार करण्यासाठी ही १२ वर्षे भक्कम पायाभरणीची ठरली आहेत. विश्वास, विकास आणि जनसहभागाची ही यात्रा पुढील काळातही अधिक वेगाने पुढे जाईल, हा देशवासीयांचा दृढविश्वास आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

# 'हे' ६ गोड पदार्थ पचनक्रिया सुधारण्यास आणि पोट हलके ठेवण्यास मदत करू शकतात

तुम्हाला मिठाई आवडते आणि त्यात काहीही चुकीचे नाही. भारतामध्ये मिठाई हे आपल्या दैनंदिन जीवनाशी, सण-उत्सवांशी निगडित आहे. खूप जास्त खाल्ल्याने किंवा चुकीच्या प्रकारची मिठाई खाल्ल्याने पोट जड झाल्यास किंवा रक्तातील साखरेची पातळी पुन्हा पुन्हा वाढू लागल्याने ही समस्या उदभवते. अशा परिस्थितीत मिठाई खाण्याचा आनंद हळूहळू अपराधीपणा आणि त्रासात बदलतो.

चांगली गोष्ट म्हणजे पचनक्रिया व्यवस्थित ठेवण्यासाठी आणि रक्तातील साखर संतुलित ठेवण्यासाठी मिठाई पूर्णपणे सोडून देण्याची गरज नाही. फक्त योग्य पर्याय निवडणे आवश्यक आहे. अशी मिठाई पौष्टिक आणि बनवायला सोपी असते. त्या मिठाईमुळे पोटावर ताण पडत नाही आणि मिठाईची लालसाही भागवते.

### आतड्याचे आरोग्य आणि रक्तातील साखरेचा कसा संबंध आहे?

तुमच्या आतड्याचे आरोग्य ठरवते की, शरीर अन्नावर कशी प्रतिक्रिया देईल. जेव्हा पचन मंद आणि संतुलित असते तेव्हा साखर हळूहळू रक्तप्रवाहात जाते. पण जेव्हा पोट कमजोर असते तेव्हा रक्तातील साखर झपाट्याने वाढते. म्हणूनच फायबर, आंबवलेले पदार्थ आणि आरोग्यदायी चरबी हे खूप महत्त्वाचे आहेत. पोट-हेल्दी स्वीट स्नॅक्स पचन मंदावते, पोट दीर्घकाळ भरलेले राहते. त्याशिवाय त्यामुळे अचानक आणि वारंवार होणारी भूकदेखील कमी होते. त्यामुळे साखर नियंत्रित करणे सोपे होते.

### तीळ व गुळाचे लाडू

तिळाचे लाडू हे फक्त हिवाळ्यातील गोड पदार्थ नसून पौष्टिक ऊर्जा वाढवणारे आहेत. तीळ पचनास मदत करतात आणि आरोग्यदायी चरबी देतात; तर गूळ नैसर्गिक गोडवा आणि खनिजे प्रदान करतात.

### नाचणीचे लाडू

नाचणी हळूहळू पचते आणि शरीराला स्थिर ऊर्जा प्रदान करते. त्यामध्ये भरपूर फायबर असल्याने पोट हलके राहते.

### खजूर आणि नारळाचे लाडू

खजूर नैसर्गिकरीत्या गोड असतात आणि ते आतड्यातील जीवाणूंना मदत करतात. नारळात आरोग्यदायी फॅट्स (चरबी)देखील असतात, जे साखरेचे शोषण कमी करतात.

### उकडीचे मोदक

उकडीचे मोदकदेखील आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात. तुम्ही मोदकात साखरेऐवजी तुम्ही गुळाचा वापर करू शकता. हे मोदक तुपाबरोबर अतिशय स्वादिष्ट लागतात.

### श्रीखंड

आतड्याच्या आरोग्यासाठी श्रीखंड दह्यामधील नैसर्गिक प्रो-बायोटिक्स पचनासाठी फायदेशीर असतात. घरी बनवलेले श्रीखंड योग्य प्रकारे तयार केल्यास पचनसंस्थेसाठी फायदेशीर ठरू शकते.

### पोहे आणि गुळाचे गोड मिश्रण

पोहे हलके आणि पचायला सोपे असतात. गूळ आणि नारळासोबत एकत्र केल्यावर हा एक समाधानकारक गोड पदार्थ तयार होतो.

# घरात या ठिकाणी दिवा लावणे आहे लाभदायी



वास्तू शास्त्रात घरात दररोज न चुकता दिवा लावण्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. दिवा केवळ अंधार दूर करत नाही, तर घरात सकारात्मक ऊर्जा आणि समृद्धी घेऊन येतो. आपण देवापुढे किंवा तुळशीजवळ दिवा लावतोच, पण वास्तूशास्त्रानुसार घरात अशा अनेक जागा आहेत जिथे नियमित दिवा लावल्याने घरात सुख समृद्धी येते आणि माता लक्ष्मीची कृपा अखंड राहते. नक्की कोणत्या आहेत या जागा आणि तिथे दिवा लावण्याचे काय फायदे आहेत? जाणून घेऊया सविस्तरपणे

### मुख्य प्रवेशद्वार

घराच्या मुख्य द्वारातून लक्ष्मी घरात प्रवेश करते. त्यामुळे रोज संध्याकाळी घराच्या मुख्य प्रवेशद्वारा बाहेर उजव्या बाजूला तेलाचा दिवा लावावा. यामुळे घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करत नाही.

### तुळशी वृंदावन

तुळशीला माता लक्ष्मीचेच रूप मानले जाते. संध्याकाशळी तुळशीपाशी दिवा लावणे शुभ मानले जाते. यामुळे घरात सुख, शांती आणि समृद्धी नांदते.

### घराचा ईशान्य कोपरा

घराच्या ईशान्य कोपऱ्यात तुपाचा दिवा लावावा, कारण हा कोपरा उत्तरपूर्व दिशा देवांची दिशा मानली जाते. यामुळे भगवान विष्णू आणि लक्ष्मी देवी प्रसन्न होतात.

### स्वयंपाकघर

देवी अन्नपूर्णेचे स्थान म्हणजे स्वयंपाकघर. येथील पाण्याच्या स्त्रोताजवळ छोटा दिवा दररोज अवश्य लावावा. यामुळे पितृदोष दूर होतो आणि पैशांची कमी पडत नाही.

# रवा बटाटा क्रंचीज



**कृती :** १ कप रवा,२ मध्यम आकाराचे उकडलेले बटाटे,२ चमचे तेल,२ चमचे किसलेले चीज,२ कप पाणी,१ चमचा चिली फ्लेक्स,चवीनुसार मीठ,१ चमचा जिरे,२ चमचे बारीक चिरलेली कोथिंबीर,तेल.

**साहित्य :** कढईत पाणी गरम करून त्यात तेल, मीठ, चिली फ्लेक्स आणि जिरे घाला.पाणी उकळू लागल्यावर रवा घालून सतत ढवळा जेणेकरून गुठळ्या होणार नाहीत.झाकण ठेवून मिश्रण २ ते ३ मिनिटे वाफवून घ्या.उकडलेले बटाटे सोलून किसून घ्या.रव्याचे मिश्रण परातीत काढून त्यात किसलेला बटाटा, चीज आणि कोथिंबीर घाला.सर्व साहित्य एकजीव करून मिश्रण पूर्णपणे गार होऊ द्या.गार झाल्यावर मिश्रण मऊसर मळून त्याचा गोळा तयार करा.गोळ्याची जाडसर पोळी लाटून घ्या.सुरी किंवा कटरच्या मदतीने गोल, चौकोनी किंवा त्रिकोणी आकारात तुकडे करा.कढईत तेल गरम करून तयार तुकडे मध्यम आचेवर तळा.दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळून घ्या.चिप्स बाहेर काढून अतिरिक्त तेल निथळू द्या आणि गरमागरम सर्व्ह करा.




# हॉलिवूडच्या रेड कार्पेटवर झळकणार मराठी सिनेमाचा जलवा



अमेरिकेतील भारतीयांच्या सांस्कृतिक दिनदर्शिकेतील सर्वात प्रतिष्ठित आणि बहुचर्चित ठरलेल्या 'नाफा मराठी चित्रपट महोत्सवा'च्या तिसऱ्या पर्वाची अधिकृत घोषणा करण्यात आली असून, यंदाचा महोत्सव गेल्या दोन वर्षांपेक्षा अधिक भव्य, अधिक ग्लॅमरस आणि अधिक दिमाखदार स्वरूपात साजरा होणार आहे. ७ ते ९ ऑगस्ट २०२६ या कालावधीत सॅनहोजे थिएटरमध्ये रंगणारा हा सोहळा केवळ मराठी चित्रपटांचा उत्सव राहणार नसून, अमेरिकेतील संपूर्ण भारतीय समुदायाला एकत्र आणणारा सांस्कृतिक महाकुंभ ठरणार असल्याची माहिती नाफाचे संस्थापक अध्यक्ष आणि राष्ट्रीय पुरस्कार विजेते निर्माते अभिजित घोलप यांनी दिली.

मराठी चित्रपटसृष्टीचा दर्जा, वैभव आणि सांस्कृतिक समृद्धी उत्तर अमेरिकेतील नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या ध्येयातून स्थापन झालेल्या 'नॉर्थ अमेरिकन मराठी फिल्म असोसिएशन' (नाफा)ने अवघ्या काही वर्षांत अमेरिकेतील सर्वाधिक चर्चिल्या जाणाऱ्या भारतीय चित्रपट महोत्सवांमध्ये आपले स्थान निर्माण केले आहे. २०२६ मधील हा महोत्सव हॉलिवूडच्या रेड कार्पेट परंपरेची झलक, चित्रपटांचे भव्य प्रीमियर, कलाकारांशी थेट संवाद, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मनोरंजनाच्या विविध रंगांनी सजलेला असेल.

अमेरिका आणि कॅनडामध्ये वास्तव्यास असलेल्या लाखो भारतीयांसाठी 'नाफा' हे आता केवळ एक व्यासपीठ नसून भारतीय चित्रपट, कला आणि संस्कृती यांना जोडणारा सशक्त सांस्कृतिक पूल बनला आहे. विशेषत: मराठी चित्रपटांना जागतिक व्यासपीठ मिळवून देण्यासाठी 'नाफा'ने केलेल्या प्रयत्नांमुळे उत्तर अमेरिकेतील प्रेक्षकांना महाराष्ट्रातील चित्रपट त्याच दिवशी चित्रपटगृहात पाहण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

'गुलकंद', 'सुजित सुशीला', 'संगीत मानापमान', 'चिकीचीकी बुबुम्बुम', 'पाणी', 'गुलाबी', 'नवरा माझा नवसाचा २', 'अशी ही जमवा जमावी', 'स्थळ' आणि 'सलतात रेशीम गाठी' यांसारख्या चित्रपटांना अमेरिकेत आणि कॅनडामध्ये उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. विशेष म्हणजे तरुण पिढीचा वाढता सहभाग हा नाफाच्या यशाचा महत्त्वाचा टप्पा ठरत आहे.

अभिजित घोलप म्हणाले, "अमेरिकेत भारतीय आणि विशेषत: मराठी चित्रपटसृष्टीसाठी स्वतंत्र आणि सक्षम व्यासपीठ निर्माण करण्याचे स्वप्न आम्ही पाहिले होते. आज नाफाशी एक हजारहून अधिक सदस्य जोडले गेले आहेत. कलाकार, दिग्दर्शक, लेखक, गायक, तंत्रज्ञ, सिनेमॅटोग्राफर्स आणि विविध क्षेत्रातील सर्जनशील व्यक्तींचा सहभाग वाढत आहे. नाफाच्या फिल्म क्लबद्वारे अनेक लघुपट आणि कलाकृतींची निर्मिती होत असून, उत्तर अमेरिकेत भारतीय चित्रपटसृष्टीचा नवा अध्याय लिहिला जात आहे."

नाफाच्या या प्रवासात प्रख्यात दिग्दर्शक, अभिनेते आणि कलावंतांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. त्यामुळेच अल्पावधीत नाफाने एक प्रभावी सांस्कृतिक चळवळ म्हणून स्वत:ची ओळख निर्माण केली आहे. निर्मितीसोबतच रेडिओसह ओटीटी क्षेत्रातही नाफाचा विस्तार झाला आहे. 'नाफा २०२६' च्या यशस्वी आयोजनासाठी संस्थापक अध्यक्ष अभिजित घोलप यांच्या नेतृत्वाखाली एक अनुभवी आणि समर्पित संचालक मंडळ कार्यरत असून, सह-समन्वयक म्हणून टेक्सासच्या अर्चना सराफ आणि कॅलिफोर्नियाच्या रिया ठोसर यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. कोषाध्यक्ष म्हणून विनायक फडणवीस (कॅलिफोर्निया) आर्थिक नियोजनाची जबाबदारी सांभाळत आहेत. विविध नियोजन समित्यांमध्ये मास्टरक्लासेस विभागासाठी गौरी कुलकर्णी (इंडियानापोलिस), चित्रपट स्पर्धा विभागासाठी भालचंद्र कुलकर्णी (टेक्सास), रेड कार्पेट समन्वयासाठी पूजा कारखानीस (कॅलिफोर्निया), आयटी इन्फ्रास्ट्रक्चरची जबाबदारी योगी पाटील (रिचमंड) यांच्याकडे असून, प्रसिद्धी जनसंपर्क नियोजन मानसी देवळेकर (कॅलिफोर्निया), अतिथी संपर्क विभागात लक्ष्मण आपटे यांचेही विशेष योगदान लाभत आहे. या सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे यंदाचा नाफा फिल्म फेस्टिव्हल अधिक भव्य, व्यावसायिक आणि संस्मरणीय ठरणार आहे.

महोत्सवाची शान अधिकच वाढवण्यासाठी यावर्षी मराठी चित्रपटसृष्टीतील अनेक मातब्बर कलावंत अमेरिकेच्या भूमीवर येणार आहेत. जेष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी, महेश मांजरेकर, महेश कोठारे, अतुल कुलकर्णी, नागराज मंजुळे, गुरु ठाकूर, श्रुती मराठे आणि गिरिजा ओक यांची विशेष उपस्थिती महोत्सवाला चार चाँद लावणार आहे. गेल्या वर्षी डॉ. मोहन आगाशे, अमोल पालेकर, संध्या गोखले, सचिन खेडेकर, गजेंद्र अहिरे, अवधूत गुप्ते, अश्विनी भावे, सोनाली कुलकर्णी, आदिनाथ कोठारे, वैदेही परशुरामी आणि मधुर भांडारकर यांनी रसिकांची मने जिंकली होती, तर त्याआधी दिलीप प्रभावळकर, सचिन-सुप्रिया पिळगांवकर, निवेदिता सराफ, महेश मांजरेकर, सुबोध भावे, जब्बार पटेल, उमेश कुलकर्णी, प्रसाद ओक आणि मृणाल कुलकर्णी यांनी महोत्सवाची शान वाढवली होती. यावर्षीची नावे पाहता हे सातत्य आणखी उंचावलेले दिसते!

हॉलिवूडच्या झगमगाटासोबत भारतीय संस्कृतीचा अभिमान, मराठी चित्रपटसृष्टीची ताकद आणि भारतीय कलावंतांची सर्जनशीलता यांचा अनोखा संगम अनुभवण्याची संधी देणारा 'नाफा २०२६' हा उत्तर अमेरिकेतील भारतीय समुदायासाठी वर्षातील सर्वात मोठा सांस्कृतिक आणि मनोरंजन सोहळा ठरणार असल्याची उत्सुकता आतापासूनच निर्माण झाली आहे.

# कॉफीशॉपमध्ये मिळाली "बनवाबनवी" नाटकाची ऑफर – समीर खांडेकर



'एका वेगळ्या प्रोजेक्टच्या मिटिंगसाठी मी एका कॉफी शॉपमध्ये गेलो होतो. तो प्रोजेक्ट तर झाला नाही. पण बाजूच्याच टेबलावर मला माझा मित्र आणि प्रभात थिएटर्स चा निर्माता हर्षद कठापूरकर भेटला आणि त्याने मला "बनवाबनवी" नाटक लिहिण्यासाठी आणि दिग्दर्शन करण्यासाठी विचारलं!गंमत म्हणून दिलेला तो होकार आयुष्य बदलणाऱ्या प्रवासाची सुरुवात ठरेल, याची तेव्हा कल्पनाही नव्हती', असं समीर खांडेकर म्हणालाय.

'गेली १५ वर्षं अभिनेता म्हणून रंगभूमीवर काम करताना मला वाटायचं की नाटक कसं घडतं हे मला पूर्णपणे माहिती आहे. पण "बनवाबनवी"ने माझ्या अनेक ठाम समजुती अक्षरश: मोडून काढल्या. मुहूर्ताच्या दिवशी माझ्यासमोर फक्त एकच गोष्ट होती. एका कोऱ्या कागदावर लिहिलेलं "बनवाबनवी" हे नाव. कथा नव्हती. पात्रं नव्हती. संवाद नव्हते. होतं फक्त एक स्वप्नआणि ते सत्यात उतरवण्याची जिद्द'.

'मराठी रंगभूमीवर कंटेंट क्रिएटर्सना केंद्रस्थानी ठेवून उभं राहणारं हे पहिलंच नाटक. शंतनू रांगणेकर वगळता बाकी सर्व कलाकार माझ्यासाठी नवीन होते आणि मी त्यांच्यासाठी. सगळेजण मला विचारत होते ,"सर, माझं पात्र कसं आहे?""माझा रोल काय आहे?"आणि माझ्याकडे उत्तर म्हणून फक्त एकच गोष्ट होती"थोडा विश्वास ठेवा. पण त्या सगळ्यांमध्ये एक गोष्ट समान होती,अटळ जिद्द! आणि तिथून सुरू झाला "बनवाबनवी"चा खरा प्रवास'.

'लाखो फॉलोअर्स असलेले हे कंटेंट क्रिएटर्स नाटकासाठी अक्षरश: झोकून देऊन काम करू लागले. सोशल मीडियावर लाखो लोकांचं मनोरंजन करणारी ही मंडळी रंगमंचावरच्या प्रत्येक क्षणासाठी पुन्हा नव्यानं विद्यार्थी झाली. हा प्रवास थोडक्यात सांगणं अशक्य आहे. कारण या प्रवासात भेटलेली प्रत्येक व्यक्ती स्वत:मध्ये एक स्वतंत्र कथा होती'

'दिग्दर्शक म्हणून मी त्यांना घडवत होतो, पण खरं सांगायचं तर तेही मला तितकंच घडवत होते कारण यातला विनोद हा माझ्या नियमीत शैलीतला विनोद नाहीय परंतू तरीही लेखक/ दिग्दर्शक म्हणून नाटक बांधतांना या कंटेन्ट क्रिएटर्सच्या विनोदाची शैली लक्षात घेऊनच त्या पद्धतीचा विनोद या नाटकात हेतु पुरस्सर लिहिला गेला. या सगळ्या प्रवासात ६० दिवसांच्या तालमींसाठी कोणतीही तक्रार न करता वेळ, विश्वास आणि स्वातंत्र्य देणारे प्रभात थिएटर्सचे निर्माते निखिल करंडे आणि हर्षद कठापूरकर..असे निर्माते मिळणं हे प्रत्येक दिग्दर्शकासाठी भाग्याची गोष्ट असते. पण या नाटकाचं सगळ्यात मोठं यश काय? तर नाटक पाहायला आलेला जवळपास ७०% प्रेक्षक आयुष्यात पहिल्यांदाच रंगमंचावरचं नाटक पाहतोय. ते कदाचित त्यांच्या आवडत्या कंटेंट क्रिएटरला पाहायला आले असतीलपण जर त्या निमित्ताने त्यांची रंगभूमीशी नाळ जोडली गेली तर माझ्यासाठी त्याहून मोठं यश नाही, कारण नवीन पिढी नाटकाकडे वळावी म्हणून असंख्य रंगकर्मी अनेक वर्षं अविरत मेहनत घेत आहेत. त्या प्रयत्नात "बनवाबनवी"ने जर का एक छोटासा खारीचा वाटा उचलला असेलतर तो माझ्यासाठी अभिमानाचा क्षण आहे'.

# "तो आजही खूप...", नाना पाटेकर अनिल कपूर यांच्याबद्दल काय म्हणाले?



'राजू बन गया जेंटलमन', परिंदा, वेलकम, वेलकम बॅक या सिनेमांत नाना पाटेकर व अनिल कपूर यांनी काम केले आहे. त्यांचे हे सिनेमे गाजले आहेत. वेलकम सिनेमातील मजनू भाई व उदय शेट्टी या त्यांच्या भूमिका प्रचंड गाजल्या होत्या. या सिनेमातील अनेक डायलॉग लोकप्रिय ठरले, सिनेमातील कॉमेडी लोकप्रिय ठरली. परिंदा सिनेमातील त्यांच्या भूमिका गाजल्या होत्या. त्यांनी एकत्र काम केलेले सिनेमे प्रचंड गाजले. खऱ्या आयुष्यातही त्यांच्यात उत्तम मैत्री असल्याचे पाहायला मिळते.

एका मुलाखतीत नाना पाटेकर यांनी अनिल कपूर यांच्याबद्दल वक्तव्य केले होते. २०२४ मध्ये नाना पाटेकरांनी द लल्लनटॉपला मुलाखत दिली होती. या मुलाखतीत त्यांना इंडस्ट्रीमधील मित्रांबद्दल त्यांना विचारले होते. त्यावेळी त्यांनी अनिल कपूर यांचेंही नाव घेतले होते. ते असेही म्हणालेले की तो मला नियमितपणे फोन करतो.

### "तो आजही खूप मेहनत"

नाना पाटेकर पुढे म्हणालेले, "तो आजही खूप मेहनत करतो. खूप चांगले काम करतो. ॲनिमल सिनेमात त्याने उत्तम काम केले आहे. मी तो सिनेमा पाहिला. मी त्याला म्हणालो की मी तुझा सिनेमा पाहिला. त्यावर त्याने मला विचारले की कसा वाटला चित्रपट? मी म्हणालो की खूप चांगलं काम केलं आहेस."

अनिल कपूर व नाना पाटेकर यांच्या मैत्रीत दुरावा आला होता, असे म्हटले जाते. १९८९ ला नाना पाटेकर व अनिल कपूर यांच्यातील वादाच्या मोठ्या प्रमाणात चर्चा झाल्या होत्या. परिंदा सिनेमातून नाना पाटेकरांना काढावे असे अनिल कपूर यांनी दिग्दर्शक विधू विनोद चोप्रा यांना सांगितले, होते, असे नाना पाटेकरांनी म्हटले होते. याच मुलाखतीत नाना पाटेकरांनी त्याबद्दल वक्तव्य केले.

नाना पाटेकर म्हणालेले, "परिंदा सिनेमात जॅकी श्रॉफने जी भूमिका साकारली, ती भूमिका मी साकारणार होतो आणि अण्णा ही भूमिका नसरुद्दिन शाह साकारणार होते. पण, त्यांनी ती भूमिका साकारण्यास नकार दिला. मी आणि अनिलने खूप सराव केला होता. मी जवळजवळ सहा महिने तयारी केली होती. मी अलिकडेच अनिलला विचारले की तू विनोदला मला चित्रपटातून काढून टाक असं सांगितलं होतं का? त्यावर तो म्हणाला की मी विचार केला की नानाला का स्टार बनवू? जर तुम्ही जॅकीने साकारलेली भूमिका केली असती तर तुम्ही स्टार झाला असतात. मी त्याला म्हणालो की मी तुला म्हणालो होतो की मला कोणतीही भूमिका दिली तरी मी स्टार बनणार आहे. तुझ्याकडे कोणीही बघणार नाही."

नाना पाटेकरांनी असेही सांगितले होते की मला चित्रपटातून काढले. पण, काही महिन्यानंतर विधू विनोद चोप्रा यांनी मला अण्णा या भूमिकेसाठी विचारले. सुरुवातीला मला राग आला पण नंतर मी ती भूमिका साकारण्यास होकार दिला.

दरम्यान, नाना पाटेकर व अनिल कपूर आगामी काळात कोणती भूमिका साकारणार हे पाहण्यासाठी प्रेक्षक आतुर आहेत.

# उन्हाळ्यात रिकाम्या पोटी मोसंबीचा रस प्यायल्याने काय होते? परिणाम पाहून थक्क व्हाल



मोसंबीचा रस आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानला जातो. लोक अनेकदा ताजा रस पिणे पसंत करतात. कारण त्यात 'व्हिटॅमिन सी' आणि विविध आवश्यक पोषक घटक असतात, जे केस आणि त्वचेसाठी चांगले असतात. मात्र, रिकाम्या पोटी याचे सेवन करणे योग्य आहे का आणि त्यासाठी कोणती खबरदारी घेतली पाहिजे? याबद्दल आपण या लेखात सविस्तर माहिती घेऊया.

### मोसंबी रसाचे फायदे खालीलप्रमाणे :

### शरीर सुदृढतेसाठी उपयुक्त

मोसंबीमध्ये 'क' जीवनसत्त्व ?भरपूर प्रमाणात असते, ज्यामुळे रोगप्रतिकार शक्ती मजबूत होण्यास मदत होते. त्याचे नियमित सेवन केल्याने शरीर बळकट होण्यास मदत होते.

### शरीरात पाण्याचे योग्य प्रमाण टिकवण्यास साह्यभूत

मोसंबीमध्ये पाण्याचे प्रमाण भरपूर असते. त्यामुळे सकाळी तिचे सेवन केल्याने शरीरात पाण्याचे योग्य प्रमाण राखण्यास मदत होते. त्यामुळे शरीरातील आर्द्रता टिकून राहते आणि उन्हाळ्यात डिहायड्रेशनचा (पाणी कमी होण्याचा) त्रास होत नाही. मात्र, मोसंबीचा रस काढल्यानंतर तो जास्त वेळ तसाच ठेवू नये.

### पचनक्रियेसाठी फायदेशीर

काही लोकांना रिकाम्या पोटी मोसंबीचा रस प्यायल्याने पचनक्रिया चांगली राहण्यास आणि पोटाला हलके वाटण्यास मदत मिळू शकते. जर तुम्हाला पोटाच्या तक्रारींचा वारंवार त्रास होत असेल किंवा बद्धकोष्ठतेचा त्रास होत असेल, तर हा रस पिणे फायदेशीर ठरू शकते.

### त्वचेसाठी फायदेशीर

क जीवनसत्त्व आणि अँटीऑक्सिडंट्स त्वचेचे आरोग्य जपण्यास आणि तिची नैसर्गिक चमक टिकवून ठेवण्यास मदत करू शकतात. तुम्ही याचा आहारात समावेश करू शकता किंवा 'फ्रूट चाट'च्या स्वरूपातही याचा आस्वाद घेऊ शकता.

### थकवा दूर करण्यास मदत

मोसंबीच्या रसामुळे शरीराला त्वरित ऊर्जा मिळते, ज्यामुळे आळस आणि थकवा कमी होण्यास मदत होते. जर थकवा कायम राहिला, तर तुम्ही डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

### याचे सेवन कोणी टाळावे?

जर तुम्हाला ॲसिडिटीचा त्रास होत असेल, तर याचे सेवन टाळावे. ज्यांना पोटातील अल्सरचा त्रास आहे, त्यांच्यासाठी यामुळे समस्या वाढू शकतात. रिकाम्या पोटी याचे सेवन केल्यास अस्वस्थता अधिक वाढू शकते.

### मोसंबीचा रस पिण्याची योग्य पद्धत

हा रस पिण्यासाठी सकाळची वेळ सर्वात उत्तम असते. घरीच ताजा रस काढून, त्यात अतिरिक्त साखर न घालता, तो पिणे सर्वात चांगले असते. नाश्त्यासोबत योग्य प्रकारे सेवन केल्यास, तुम्ही यात चिमूटभर काळे मीठ घालूनही तो घेऊ शकता.




- मेष – कमी श्रमात कामे होतील. तारतम्याने वागा. सामाजिक बांधिलकी जपाल.
- वृषभ – मित्र मदत करतील. अधिक जबाबदारीने काम करावे लागेल.
- मिथुन – हाताखालील लोकांचे सहकार्य मिळेल. नातेवाईकांची ये-जा वाढेल.
- कर्क – भागीदारीतील कार्यात पुढाकार घ्याल. कौटुंबिक समस्या सोडवाल.
- सिंह – जोडीदाराचा वरचष्मा राहील. उत्तम वैवाहिक सौख्य लाभेल. सहकाऱ्यांची नाराजी पत्करू नका. चारचौघांत कौतुक होईल.
- कन्या – एकलकोंडेपणा दूर होईल. सर्वांशी सौजन्याने वागा. धार्मिक कामात पुढाकार घ्याल.
- तूळ – धंद्यात मोठा फायदा होईल. घरातील कामे होतील. खर्चावर मर्यादा घाला.
- वृश्चिक – आपल्या आत्मविश्वासात भर पडेल. धंद्यात वाद तसेच अरेरावी करू नका. सामाजिक कार्याला हातभार लावाल.
- धनु – मनाप्रमाणे घटना घडतील. वाटाघाटीचा प्रश्न मार्गी लावाल. चौकसपणे विचार करावा.
- मकर – वरिष्ठांकडून कौतुक केले जाईल. स्वत:च्या मर्जीने वागाल. कुणालाही कमी समजू नका.
- कुंभ – कार्यपद्धतीचे कौतुक केले जाईल. भावंडांचे सहकार्य मिळेल. वरिष्ठांशी मिळते जुळते धोरण स्वीकारावे.
- मीन – कौटुंबिक आनंद वाढेल. गैरसमजापासून दूर राहा.

# अनिल अंबानी यांना करचुकवेगिरी प्रकरणी हायकोर्टाचा अंतरिम दिलासा, सुनावणी होईपर्यंत कारवाई न करण्याचे निर्देश


मुंबई (विशाल कारंडे) : उद्योगपती अनिल अंबानी यांना मुंबई उच्च न्यायालयानं करचुकवेगिरीच्या प्रकरणात अंतरिम दिलासा दिलाय. काळा पैसा आणि साल २०१५च्या कर आकारणी कायद्यांतर्गत जारी केलेल्या कारणे दाखवा नोटीस विरोधात अनिल अंबानी यांनी दाखल केलेली याचिका न्यायमूर्ती बर्गीस कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठानं अंतिम सुनावणीसाठी दाखल करून घेतलीय. तसेच सुनावणी पूर्ण होईपर्यंत अंबानी यांच्याविरोधात खटला चालवण्यापासून तसेच कोणतीही कठोर दंडात्मक कारवाई करण्यापासून त्यांना अंतरिम दिलासा दिलाय.



**काय आहे अनिल अंबानी यांचा दावा** – या कायद्यातील काही तरतुदी भारताच्या संविधानाशी विसंगत असून त्या मुलभूत अधिकारांचं उल्लंघन करणाऱ्या आहेत, असा दावा अनिल अंबानी यांनी आपल्या याचिकेतून केलाय. न्यायमूर्ती बर्गीस कुलाबावाला आणि न्यायमूर्ती फिरदोश पूनीवाला यांच्या खंडपीठानं अंबानी यांची याचिका अंतिम सुनावणीसाठी दाखल करून घेताना केंद्र सरकारलाही या याचिकेवर आपलं प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश जारी केलेत. या कायद्याच्या वैधतेला आव्हान देणाऱ्या इतर काही याचिकाही मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहेत. अंबानी यांच्या याचिकेनुसार, काळा पैसा प्रतिबंधक कायदा २०१५ मध्ये लागू करण्यात आलाय. तर संबंधित व्यवहार हा साल २००६-०७ आणि २०१०-११ या कर-निर्धारण वर्षांतील आहेत. त्यामुळे हा कायदा पूर्वलक्ष्यी प्रभावानं इथं लागू होत नाही, असे अंबानीच्या याचिकेत म्हटलं आहे.

**हायकोर्टाचे नेमके नर्देश काय** – अनिल अंबानी यांच्या विरोधात आधीच कर निर्धारण आदेश पारित करण्यात आलाय. याविरोधात त्यांनी अपिलीय प्राप्तिकर आयुक्तांकडे धाव घेऊन अपील दाखल केलेलं आहे. या अपीलाची प्रक्रिया सुरू राहू शकते. त्यावर आदेशही पारित केले जाऊ शकतात. मात्र, या याचिकेवरील सुनावणी आणि अंतिम निकालापर्यंत याचिकाकर्त्याविरुद्ध खटला किंवा दंड आकारण्यासारखी कोणतीही कठोर कारवाई करता येणार नाही, असंही हायकोर्टानं अनिल अंबानी यांना दिलासा देताना आपल्या आदेशांत स्पष्ट केलंय.

**काय आहे प्रकरण** – दोन स्विस बँक खात्यांमध्ये असलेल्या ८१४ कोटी रुपयांहून अधिक रकमेवर ४२० कोटी रुपयांचा कर चुकवल्याच्या आरोपांप्रकरणी प्राप्तिकर विभागानं ८ ऑगस्ट २०२२ रोजी अनिल अंबानी यांना नोटीस बजावली होती. अंबानी यांनी जाणीवपूर्वक कर चुकवला असून त्यांनी तपास अधिकाऱ्यांकडे आपल्या परदेशी बँक खात्याचा तपशील आणि आर्थिक हितसंबंधांची माहिती हेतूत: उघड केली नाही, असा आरोप प्राप्तिकर विभागानं लावलाय. या नोटीसनुसार, अंबानी हे बहामासमधील डायमंड ट्रस्ट आणि ब्रिटिश व्हर्जिन आयलंड्समध्ये नोंदणीकृत असलेली नॉर्दर्न अटलांटिक ट्रेडिंग अनलिमिटेड या कंपन्यांचे आर्थिक योगदानकर्ते तसेच लाभार्थी होते. मात्र, अंबानी यांनी आपल्या प्राप्तिकर विवरणपत्रात या परदेशी मालमत्तांची माहिती उघड केली नाही. त्यामुळे त्यांनी काळा पैसा प्रतिबंधक कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केलंय. कर अधिकाऱ्यांनी या दोन खात्यांमधील उघड न केलेल्या निधीचं एकूण मूल्य ८,१४,२७,९५,७८४ रुपये इतकं निश्चित केलंय. तर या रकमेवर देय असलेला कर ४,२०,२९,०४,०४० इतकं लावण्यात आलंय.



# FIFA World Cup Set For Kickoff After High Ticket Prices, Visa Issues Dog Buildup

Mexico City: The World Cup kicks off Thursday with co-hosts Mexico taking on South Africa in the Estadio Azteca in Mexico City, launching a sprawling tournament of 48 teams that will last nearly six weeks.

The extravaganza hosted by the United States, Mexico and Canada is the biggest World Cup in history, stretching until the final in New Jersey on July 19.

It is projected to generate a record-breaking $13 billion in total revenue.

But football's world governing body FIFA has faced stinging criticism over the eye-watering costs of tickets while Donald Trump's immigration crackdown has seen a top referee, Iranian team officials and fans refused entry to the United States.

Speaking in Mexico City on Wednesday, FIFA President Gianni Infantino launched a spirited defense of the organization of the tournament and brushed off criticism over visa issues.

Infantino insisted that tickets -- which in some cases have topped $30,000 -- had been priced appropriately, citing a small number of $60 tickets that were made available in response to criticism.

"Let me just say that our entry price, which is 60 dollars, is the lowest entry price of any of the American sports in the play-off phases," Infantino said.

"Our average price which is below 500 dollars is again the lowest of the American sports on average."

**'We don't control everything'**



Infantino also played down the controversy surrounding Somali World Cup referee Omar Artan, who was refused entry after arriving in Miami.

FIFA has since confirmed Artan, who the US State Department said had "associated with suspected members of terrorist organizations," will play no part in the tournament.

"It is unfortunate what happened to the referee from Somalia," Infantino said.

"We don't control everything... Sometimes it's good to chill, relax, we work on everything, we try to solve everything."

The FIFA leader also portrayed Iran's participation at the World Cup in the midst of its military conflict with the US as a victory for his organization.

"People were saying Iran couldn't come to the World Cup," Infantino said.

"There are challenges, it's not easy, but I don't know who else would have been able to ensure in these circumstances -- which we could not influence -- Iran could come and play."

Infantino's close relationship with Trump has come under scrutiny but the FIFA chief lavished praise on the US president.

"Without his engagement and involvement, I think it would have been, simple as that, impossible to organize a World Cup in the United States," Infantino said of Trump.

Trump confirmed on Wednesday he plans to attend some World Cup matches, without providing details.

"I spoke to Gianni this morning... he said there's never been anything close" to the success of the coming tournament, Trump said.

**Wall of noise**

South Africa coach Hugo Broos warned his players to block out a wall of sound during the opening match in the Estadio Azteca, a legendary venue that hosted the 1970 and 1986 World Cup finals.

"They will have 85,000 Mexicans shouting and singing. But we have to focus on our game. And if we can do that... then we can have a good game," the Belgian said.

Mexico have not won any of their seven appearances in an opening game. "We have to break the statistic," coach Javier Aguirre said.

"It will be another source of motivation."

South Korea and the Czech Republic play the second game on the opening day, in Guadalajara.

Spain, France and England are the favourites, while reigning champions Argentina will look to their 38-year-old talisman Lionel Messi to drive them to the final.

England wrapped up their preparations on Wednesday with an impressive 3-0 win over a feisty Costa Rica in a match delayed by an hour because of thunderstorms in Orlando.

Coach Thomas Tuchel liked his side's intensity as Declan Rice, Anthony Gordon and Ollie Watkins got on the scoresheet.

"Until now, it was more a feeling of a pre-season, like an overseas pre-season," the England boss said. "I think we set the tone today."

# Dr. Priya Selvaraj, Granddaughter Of Late Actor Gemini Ganesan, Climbs Mount Everest At 52

Chennai : Life starts going downhill for most women her age. But not for Dr Priya Selvaraj, granddaughter of the late actor Gemini Ganesan. She chose an uphill task: To scale Mount Everest (8,849m) at 52. And she achieved that on May 27, 2026.

"Everest was the destination, but the real test of integrity lay in the journey," says Dr Selvaraj, a senior fertility specialist and the director of a famous hospital in Chennai. "Although reaching Mount Everest is a difficult goal, I undertook this journey with determination and spiritual commitment. This journey was full of challenges. This was possible due to intensive training and the support of my family."

Balancing a demanding medical practice, leadership responsibilities, family commitments and an intensive training schedule was the first challenge she accepted.

"As a healthcare professional, training doesn't happen in ideal conditions. It's built between responsibilities, long days and mental fatigue. There's no perfect terrain to prepare for this either. I relied on my coach. I relied on my mind and body. And above all, I relied on trust – in the process," she says.



**Practising At Home & Hospital**

Dr Selvaraj claims she got the idea of climbing mountains only in the year 2021. After that, she trained for four years. "My training was limited to my home and hospital. I did not train by climbing mountains. I trained by climbing stairs and overpasses at home and hospital. This helped me in training to climb such a big mountain in 45 days," she says.

The ascent was full of odds. "I climbed the mountain for 12 to 13 hours every day. Due to this, I have set a record by climbing the mountain in eight days. A total of 12 of us, six women and six men, started the journey and faced various challenges, including a lack of oxygen," she says.

Dr Selvaraj undertook the expedition with Elite Exped, founded by renowned mountaineer Nirmal Purja, and was guided by experienced high-altitude guide Anup Gurung. Her preparation was led by fitness coach Dr Sugapradeep, a dentist, national athlete, combat fitness coach and strength and conditioning specialist.

Having previously trained her for expeditions, including Kilimanjaro (5,895m), Everest Base Camp and Lobuche East (6,119m), and Manaslu (8,163m), he designed a structured programme for Mount Everest that focused on endurance, strength, altitude adaptation, recovery and mental resilience required for high-altitude mountaineering.

Climbing Mount Everest was a test of endurance and physical fitness. "I noticed a change in my health on my way back to Kathmandu, the capital of Nepal. After coming from there to Chennai, I felt body pain and heat," she says.

# अमराठी चालकांनी मराठी शिकावे – प्रताप सरनाईक

● मुंबई, विशाल कारंडे :

मराठी ही केवळ संवादाची भाषा नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीची, अस्मिता आणि सामाजिक एकात्मतेची ओळख असल्याने तिचे संवर्धन व सन्मान ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे, असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले. अमराठी व्यावसायिक प्रवासी वाहतूक चालकांनी व्यवहारिक मराठी शिकून प्रवाशांबरोबर मराठीत संवाद साधावा, या उपक्रमाला व्यापक लोकसमर्थन मिळावे यासाठी त्यांनी खुले पत्र लिहून सहकार्याचे आवाहन केले आहे.

महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या प्रत्येक व्यावसायिक प्रवासी वाहन चालकाला व्यवहारिक मराठीचे ज्ञान असणे ही काळाची गरज आहे. प्रवाशांबरोबर संवाद साधताना मराठीचा वापर वाढल्यास भाषेचे संवर्धन होण्याबरोबरच समाजातील परस्पर संवाद अधिक सुसंवादी, आत्मीय आणि परिणामकारक बनेल, असे सरनाईक यांनी पत्रात म्हटले आहे.

भाषा ही केवळ शब्दांची देवाणघेवाण नसून ती संस्कृती, परंपरा, मूल्ये आणि सामाजिक ओळख जपणारी एक माध्यम आहे. त्यामुळे मराठी भाषेचा दैनंदिन व्यवहारात अधिकाधिक वापर



होणे आवश्यक आहे, असे सरनाईक यांनी मराठी भाषेचे महत्त्व अधोरेखित करताना पत्रात नमूद केले आहे.

मुंबई महानगर क्षेत्रासह राज्यातील विविध भागांमध्ये मोठ्या संख्येने अमराठी चालक प्रवासी वाहतूक क्षेत्रात कार्यरत आहेत. हे चालक मराठी शिकून प्रवाशांबरोबर मराठीत संवाद साधू लागले, तर ते मराठी भाषेच्या सन्मानासाठी आणि सामाजिक समन्वयासाठी महत्त्वाचे पाऊल ठरेल, असेही त्यांनी स्पष्ट केले. आपण आपल्या राज्यात नागरिक किंवा प्रवासी म्हणून वावरताना मराठी भाषेचा आग्रह धरणे स्वाभाविक आहे. मराठीचा अभिमान आणि तिचा वापर ही सवय प्रत्येकामध्ये रुजविण्याची वेळ आता आली आहे, असे सरनाईक यांनी म्हटले आहे.

समाजमन घडविण्यात प्रसारमाध्यमांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. या उपक्रमाला वृत्तपत्रे, वृत्तवाहिन्या आणि डिजिटल माध्यमांतून प्रसिद्धी मिळाल्यास मराठी भाषा शिकण्याची चळवळ अधिक व्यापक आणि प्रभावी बनेल. माध्यमांच्या सहकार्यामुळे मराठी संवाद संस्कृतीला नवे बळ मिळेल आणि जनजागृतीचा संदेश राज्याच्या कानाकोपऱ्यात पोहोचेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मराठी भाषा, मराठी संस्कृती आणि महाराष्ट्राची अस्मिता यांचा सन्मान राखण्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन हा उपक्रम यशस्वी करावा, असे आवाहन सरनाईक यांनी केले.

# भूसंपादनाची भरपाई देण्यासाठी १ लाख २० हजार लाचेची मागणी

● नगर, शकील शेख :

राष्ट्रीय महामार्गासाठी झालेल्या भूसंपादनाच्या नुकसान भरपाईची मंजूर झालेली रक्कम मिळवून देण्यासाठी १ लाख २० हजार रुपयांच्या लाचेची मागणी करणाऱ्या श्रीगोंदे-पारनेर उपविभागीय कार्यालयातील दोन कर्मचाऱ्यांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील एका कर्मचाऱ्याला अटक करण्यात आली आहे तर दुसरा कर्मचारी फरार आहे.

श्रीगोंदे-पारनेर उपविभागीय कार्यालय अहिल्यानगर शहरात, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात आहे. तेथील महसूल सहाय्यक मंगेश विजय ढुमणे व कंत्राटी कर्मचारी अमोल कानिफनाथ खामकर या दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून ढुमणे याला अटक करण्यात आल्याची माहिती लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस उपअधीक्षक अजित त्रिपुटे यांनी दिली.



श्रीगोंदे तालुक्यातील जंगलेवाडी येथील तक्रारदाराची गट क्रमांक १३ मधील १४३ गुंठे जमीन राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ मध्ये रेल्वे उड्डाणपुलाच्या कामासाठी भूसंपादन केलेली आहे. या शेतजमिनीच्या नुकसान भरपाईची १ कोटी ४७ लाखांची रक्कम राज्य सरकारने मंजूर केली आहे. ही रक्कम मिळण्यासाठी तक्रारदाराने महसूल सहाय्यक मंगेश ढुमणे व कंत्राटी कर्मचारी अमोल खामकर यांची भेट घेतली. तेव्हा दोघांनी तक्रारदाराकडे लाचेची मागणी केली.

त्यानंतर ४ मे रोजी ढुमणे याने तक्रारदाराला व्हाट्सअप कॉल करून १ लाख २० हजार रुपये लाचेची मागणी करून, जर पैसे दिले तर फंड ट्रान्सफर ऑर्डर लगेच हातात देतो, फंड ट्रान्सफर ऑर्डर जनरेट करण्यासाठी 'प्रांत साहेबांना' पैसे द्यावे लागतील, अशी मागणी केल्याची तक्रारदाराने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दिली होती. या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक पथकाने लाचेच्या मागणीची पडताळणी केली व दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस निरीक्षक छाया देवरे यांच्यासह पोलिस अंमलदार गजानन गायकवाड, सचिन सुद्रुक, वैभव सुपेकर यांनी ही कारवाई केली.

राष्ट्रीय महामार्गाचे अनेक प्रकल्प जिल्ह्यात सुरू आहेत. त्यासाठी झालेल्या भूसंपादनाच्या भरपाईची रक्कम मंजूर झाली, मात्र संबंधित जमीन मालकाला ती प्रत्यक्षात मिळाली नाही, अशी अनेक प्रकरणे सध्या जिल्ह्यात प्रलंबित आहेत. रक्कम मिळण्यासाठी संबंधित नागरिकांना महसूल कार्यालयात वारंवार हेलपाटे मारावे लागतात.

# नाशिक-त्र्यंबकेश्वरमध्ये खासगी वाहनांना 'नो एंट्री'

● नाशिक, सचिन कदम :

सिंहस्थ कुंभमेळा २०२७ दरम्यान अमृत पर्वणीच्या दिवशी नाशिक व त्र्यंबकेश्वरमध्ये वाहतूक कोंडी टाळण्यासाठी, देशभरातून येणाऱ्या भाविकांच्या खासगी वाहनांना शहरात प्रवेश बंद अर्थात 'नो एंट्री' असणार आहे. शहराच्या बाहेरील नियोजित वाहनतळांवर संबंधितांची खासगी वाहने थांबवली जातील. तेथून भाविकांना विशेष बससेवेद्वारे घाट परिसरात अमृत स्नानासाठी नेण्याचे नियोजन आहे.

२०१५ च्या कुंभमेळ्यात खासगी वाहने शहराच्या सीमेवरील वाहनतळांवर थांबवली गेली होती. त्यामुळे लाखो भाविकांना अमृत स्नानासाठी मोठी पायपीट करावी झाली होती. मागील कुंभमेळ्यातील अनुभव, वाहतूक व्यवस्थेतील अडचणी आदींचा अभ्यास करून २०२७ च्या कुंभमेळ्यासाठी प्रमुख मार्गालगत नवीन वाहनतळांची निवड करण्यात आल्याचा दावा नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाने केला




आहे. भाविकांचा प्रवास सुलभ करण्यासाठी प्राधिकरणाने त्रिस्तरीय वाहनतळ व्यवस्थेचे नियोजन केले आहे. त्याअंतर्गत नाशिकमध्ये सुमारे ८८८ हेक्टर क्षेत्रावर ४६ वाहनतळ, तर त्र्यंबकेश्वरमध्ये सुमारे ६७१ हेक्टर क्षेत्रावर २६ वाहनतळ नियोजित आहेत. या संपूर्ण व्यवस्थेची एकत्रित क्षमता सुमारे तीन लाख मोटारी इतकी प्रस्तावित आहे. ही प्राथमिक आकडेवारी असून आवश्यकतेनुसार त्यामध्ये बदल केला जाईल. वाहनतळात दुचाकी, चारचाकी तसेच बससाठी स्वतंत्र व्यवस्था करण्यात येणार असून भाविकांसाठी आवश्यक मूलभूत सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. ही वाहनतळ व्यवस्था कुंभमेळ्याच्या वाहतूक आराखड्याशी जोडण्यात आली असून गर्दीच्या दिवशी सुमारे तीन हजार एसटी बसच्या माध्यमातून बाह्य वाहनतळ ते घाट परिसर अशी शटल सेवा चालविण्याचे नियोजन आहे. शहरात येणाऱ्या प्रमुख मार्गांवर पहिल्या टप्प्यात बाह्य (आऊटर) वाहनतळांवर वाहनांचे नियोजन केले जाईल. त्यानंतर दुसऱ्या स्तरावरील (आऊटर १ वाहनतळ) पार्किंग, वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी 'बफर' म्हणून कार्य करेल. तर तिसऱ्या स्तरावरील अंतर्गत वाहनतळ (इनर पार्किंग) परिसरापर्यंत केवळ एसटी महामंडळाच्या विशेष बससेवेद्वारे भाविकांना आणले जाणार आहे. तेथून पुढील घाट परिसर हा पायी प्रवासासाठी नियोजित केला जाणार आहे. अमृत स्नानाच्या गर्दीच्या दिवशी मुख्य शहर परिसरात खासगी वाहनांना प्रवेश दिला जाणार नाही. भाविकांनी वाहन उभे केल्यानंतर पुढील प्रवास सुरळीत आणि नियोजनबद्ध पद्धतीने व्हावा, यासाठी वाहनतळ व्यवस्था महत्त्वाची ठरणार असल्याचे कुंभमेळा आयुक्त शेखर सिंह यांनी म्हटले आहे.

# पत्नीने ओढला नांगर; सरकारने केली मदत!

● लातूर, विशाल पाटील :

लातूर जिल्ह्यातील देवणी तालुक्यातील बोंबळी खुर्द येथील शेतकरी काशिनाथ गायकवाड यांचा एक व्हिडिओ सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला व राज्यभरातून हळहळ व्यक्त करण्यात आली. विजेच्या तडाख्यात एक बैल दगावल्यानंतर दुसरा बैल खरेदी करण्याची आर्थिक क्षमता नसल्याने शेतकरी गायकवाड यांच्या पत्नी औसाबाई यांनी स्वत:ला नांगराला जुंपून शेताची नांगरणी केल्याचे या व्हिडिओत दिसून आले होते.

या प्रकरणाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी तातडीने दखल घेत जिल्हा प्रशासनाला



आवश्यक मदतीचे निर्देश दिले.

त्यांनी लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधून जवळच्या गोशाळेतून शेतकऱ्याला नांगरणीसाठी बैल उपलब्ध करून देण्याचे आदेश दिले. तसेच नव्याने बैल खरेदी करता यावा यासाठी ३२ हजार रुपयांचे सानुग्रह अनुदान मंजूर केले.

# राज्यातील कृषी विद्यापीठांच्या सुधारित आकृतीबंधास मंजुरी

## ३ हजार ७२३ पदांना मान्यता – कृषी मंत्री दत्तात्रय भरणे

● मुंबई, राकेश गायकवाड :

"राज्यातील कृषी शिक्षण, संशोधन आणि विस्तार व्यवस्थेला अधिक सक्षम करण्यासाठी कृषी विद्यापीठांच्या 'अ' आणि 'ब 'संवर्गातील एकूण ३,७२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली आहे. २००३ नंतर म्हणजेच २३ वर्षांनी नवीन आकृतीबंध तयार करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यापीठांमधील मनुष्यबळ व्यवस्थापन अधिक परिणामकारक होईल, संशोधन व अध्यापनाच्या गुणवत्तेत वाढ होईल तसेच आधुनिक कृषी तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत अधिक



वेगाने पोहोचविण्यास मदत मिळेल, अशी माहिती कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.

राज्यातील चारही कृषी विद्यापीठांच्या गट-अ व गट-ब संवर्गातील पदांच्या सुधारित आकृतीबंधास राज्य शासनाने मंजुरी दिली आहे. कृषी व पदुम विभागाने यासंदर्भातील शासन निर्णय जारी केला असून, नियमित ३,६११ पदे आणि बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यात येणारी ११२ पदे अशा एकूण ३,७२३ पदांच्या सुधारित आकृतीबंधाला मान्यता देण्यात आली आहे.

या निर्णयामुळे राज्यातील महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी; डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला; डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी यांच्या प्रशासकीय आणि शैक्षणिक व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार आहे.

शासन निर्णयानुसार महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी येथे १,२१७, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली येथे ५८९, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी येथे ८९० आणि डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे ९१५ नियमित पदांच्या आकृतीबंधास मान्यता देण्यात आली आहे. तसेच काही पदे बाह्य यंत्रणेद्वारे भरण्यासही मंजुरी देण्यात आली आहे.

शासनाने स्पष्ट केले आहे की, गट-क आणि गट-ड संवर्गातील पदांबाबतची कार्यवाही स्वतंत्रपणे सुरू असून त्यासंदर्भातील आदेश नंतर जारी करण्यात येतील.

# शेणोली खिंडीतील स्वातंत्र्यसैनिकांच्या शौर्यगाथेला ८३ वर्षे पूर्ण; कराडमध्ये 'शौर्य स्मरण दिन' साजरा

● कराड, दिगंबर जाधव :

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या इतिहासात सातारा जिल्ह्यातील पत्री सरकारच्या सशस्त्र संघर्षाला विशेष स्थान आहे. इंग्रजांच्या साम्राज्याला थेट आव्हान देणाऱ्या आणि भूमिगत स्वातंत्र्यसैनिकांच्या धाडसाचे प्रतीक ठरलेल्या कराड तालुक्यातील शेणोली खिंडीतील ब्रिटिशांच्या पगार रेल्वेगाडी लुटीच्या ऐतिहासिक घटनेला यंदा ८३ वर्षे पूर्ण झाली आहेत. ७ जून १९४३ रोजी घडलेल्या या धाडसी कारवाईने इंग्रज सरकारला जबर धक्का दिला होता. या निमित्ताने क्रांतिवीर स्वातंत्र्यसैनिक रामराव पाटील यांचे सुपुत्र प्रकाश पाटील यांनी सहकाऱ्यांसह शेणोली खिंडीतील घटनास्थळी भेट देऊन स्मरणफलक फडकावला आणि या ऐतिहासिक घटनेची प्रेरणा




नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्याची धग ग्रामीण भागापर्यंत पोहोचली होती. तत्कालीन सातारा जिल्ह्यातील जनतेने क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखालील पत्री सरकारच्या चळवळीला मोठा पाठिंबा दिला होता. भूमिगत राहून अनेक क्रांतिकारक इंग्रजांविरुद्ध घातपाती कारवाया करत होते. मात्र, स्वातंत्र्यलढा अधिक प्रभावीपणे पुढे नेण्यासाठी निधीची मोठी आवश्यकता होती. शस्त्रास्त्रे खरेदी करणे, भूमिगत कार्यकर्त्यांची व्यवस्था करणे आणि चळवळीला आर्थिक बळ देणे यासाठी इंग्रजांच्या कर्मचाऱ्यांचा पगार घेऊन जाणारी रेल्वेगाडी लुटण्याची योजना आखण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराजांनी सुरतेवरील मोहिमेद्वारे शत्रूचा खजिना हस्तगत करून स्वराज्य उभारले, त्याच प्रेरणेतून हा धाडसी निर्णय घेण्यात आला.

या मोहिमेत सहभागी असलेले शेणोली गावचे देशभक्त क्रांतीवीर रामराव पाटील यांनी आपल्या गावाजवळील शेणोली खिंडीची जागा सुचवली. पुणे-मिरज रेल्वेमार्गावरील ही खिंड दोन डोंगरांच्या मधोमध, दाट झाडीने वेढलेली आणि रेल्वेमार्गाला इंग्रजी 'एस' आकाराचे वळण असलेली असल्याने कारवाईसाठी अत्यंत अनुकूल होती. ७ जून १९४३ रोजी नियोजनाप्रमाणे रेल्वेगाडी येण्यापूर्वी रेल्वे रुळांवर दगडांचा ढीग टाकण्यात आला. चढाचा रस्ता असल्याने गाडीचा वेग कमी होता. गाडीचालकाच्या लक्षात हा अडथळा येताच त्याने गाडी थांबवली. त्याचवेळी गाडीच्या मागील बाजूसही दगडांची भिंत उभारण्यात आली.

### १६ स्वातंत्र्यसैनिकांचा सहभाग

या धाडसी मोहिमेत क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड (कुंडल), क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी (वाळवा), देशभक्त रामराव पाटील (शेणोली) यांच्यासह अन्य १६ स्वातंत्र्यसैनिक सहभागी होते. शेणोली खिंडीतील ही कारवाई केवळ आर्थिक लूट नव्हती, तर ती इंग्रज सत्तेला दिलेले थेट आव्हान होते. या घटनेमुळे पत्री सरकारच्या चळवळीला नवी ऊर्जा मिळाली आणि ग्रामीण भागातील स्वातंत्र्यलढ्याची ताकद देशासमोर अधोरेखित झाली.

### स्मृतिस्थळ उभारण्याची मागणी

या ऐतिहासिक घटनेच्या ८३व्या स्मृतिदिनानिमित्त प्रकाश पाटील यांनी घटनास्थळी जाऊन स्मरणफलक फडकावला. यावेळी त्यांनी शासनाने शेणोली खिंड येथे स्वातंत्र्यसैनिकांच्या स्मरणार्थ भव्य स्मृतिस्थळ उभारावे, अशी मागणी केली. या ठिकाणी स्मृतिस्थळ उभारल्यास नव्या पिढीला स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास समजेल आणि देशभक्तीची प्रेरणा मिळेल, अशी भावना प्रकाश पाटील यांनी व्यक्त केली.

# महापालिकेच्या ३७ कामचुकार कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई

● सांगली, प्रथमेश चव्हाण :

विनापरवाना गैरहजर राहणाऱ्या महापालिकेच्या ३७ कर्मचाऱ्यांना आयुक्त संजीता महापात्र यांनी निलंबित करून बुधवारी घरचा रस्ता दाखवला. आयुक्तांच्या या कारवाईमुळे कर्मचारी वर्गात खळबळ माजली आहे. कामचुकारपणा करणाऱ्या कर्मचाऱ्यावर अशीच कठोर कारवाई करण्याचा इशारा आयुक्तांनी दिला आहे.

महानगरपालिका क्षेत्रात नागरी सुविधा आणि अत्यावश्यक सेवांमध्ये कोणताही हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही, असा सज्जड इशारा देत महापालिका आयुक्त श्रीमती महापात्र यांनी कामचुकार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईचा बडगा उगारला. सक्षम प्राधिकाऱ्यांची कोणतीही पूर्वपरवानगी न घेता आणि रजा मंजूर नसताना सलग ९० दिवसांपेक्षा जास्त काळ अनधिकृतपणे गैरहजर राहणाऱ्या विविध विभागांतील एकूण ३७ कर्मचाऱ्यांना महापालिका सेवेतून तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले. या सर्व कर्मचाऱ्यांवर केवळ निलंबनाची कारवाई न करता, 'महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार



बडतर्फीची कारवाई प्रस्तावित करण्यासाठी विभागीय चौकशी देखील सुरू करण्यात आली आहे.

महानगरपालिकेच्या सर्व चारही क्षेत्रीय कार्यालयांतर्गत वॉर्ड मुकादम, स्वच्छता निरीक्षक आणि साहाय्यक आयुक्तांमार्फत हजेरी मस्टरची कसून तपासणी करण्यात आली. त्यामध्ये दीर्घकाळापासून गायब असलेले खालील कर्मचारी दोषी आढळले :आरोग्य व स्वच्छता विभागातील २८ तर पाणी पुरवठा विभागातील ५ कर्मचारी निलंबनाच्या कारवाईत सापडले आहेत. अग्निशमन विभाग, जलनिस्सारण, सार्वजनिक बांधकाम विभाग, सुरक्षा विभाग यामधील प्रत्येकी एक अशा ३७ कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. यामध्ये सफाई कामगार, शिपाई यांचा समावेश आहे.